अमृत कुंभ

वर्ष १४ | अंक ४ | ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२० | मूल्य रु. १३/-

भावपूर्ण श्रद्धांजली

राजयोगिनी ब्र.कु.मोहिनी दादींचा जन्म सन१९३७ मध्ये ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातच झाला. त्या आईच्या पोटात असतानाच त्यांची आई (किशनीमाता) ईश्वरी ज्ञानयज्ञात समर्पित झाल्या.

ब्रह्माबाबा, मातेश्वरी जगदंबा आणि अनेक दादी-दीदींच्या पालनपोषणात त्या लहानाच्या मोठ्या झाल्या.

पाटणा, मेरठ, कानपुर लखनौ इत्यादी ठिकाणी सेवा करीत, त्या १९६४ साली मुंबईतील कुलाबा सेवाकेंद्रावर आल्या. तेव्हापासून त्या कुलाबा सेवाकेंद्रावर येणाऱ्या ब्रह्मावत्सांच्या सेवेत जीवन व्यतीत करीत राहिल्या.

काही काळाकरिता मोहिनीदादींनी ब्रह्माबाबांकरिता भोजन बनविण्याची सेवाही केली. हे पाहून, ''तू तर ब्रह्माबाबा आणि शिवबाबा दोघांनाही खुश केलेस'' या शब्दांत ब्रह्माबाबांनी त्यांना शाबासकी दिली.

त्यांना अव्यक्त बापदादांनी वरदान दिले- तू सदैव शक्तिसेना आहेस, सहनशीलता आणि गांभीर्याची विशेष शक्ती तुझ्यात आहे.

ईश्वरी ज्ञानयज्ञाच्या आदि काळापासून वास्तव्य करणाऱ्या मोहिनी दादी पूर्वज रत्नांपैकीच एक होत्या 'एकनामी आणि इकॉनॉमीच्या' त्या साक्षात मूर्त होत्या. त्यांच्या अलौकिक पालनपोषणाने प्रभावित होऊन अनेक ब्रह्मावत्स, शिवबाबांच्या प्रेमात मग्न होत असत. मोहिनी दादी विशेष स्वरूपात ॲक्युरेट आणि अलर्ट (प्रत्येक कार्यात कुशल आणि दक्ष) होत्या. प्रत्येक काम वेळच्यावेळी करीत असत. सुहास्यवदनी मोहिनी दादी प्रत्येक कार्य स्फूर्तीपूर्ण होऊन करीत असत. त्यांची कर्तव्यपरायण वृत्ती पाहून अनेकांना प्रेरणा मिळत असे. अशा अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या स्वामिनी, मोहिनी दादी प्रभुप्रेमात लीन असत.

२५ सप्टेंबर २०२० रोजी रात्री नऊ वाजता विश्व विद्यालयाच्या मुख्यालयात, माउंट आबू येथे त्यांनी आपला नश्वर देह ठेवला आणि पुढील ईश्वरी कार्यासाठी मार्गस्थ झाल्या.

मोहिनी दादींना मुलुंड सबझोनतर्फे भावांजली अर्पित करीत आहोत.

ब्र. कु. गोदावरी दीदी
संचालिका मुलुंड सबझोन, प्रकाशिका, अमृतकुंभ

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १४, अंक ४. ऑक्टोबर – नोव्हेंबर २०२०

मुखपृष्ठाविषयी

दीपावली हा दिव्यांचा म्हणजेच प्रकाशाचा सण. आत्मरूपी दीपक ज्ञानाच्या प्रकाशाने तेवत ठेवायचा आणि स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनात प्रकाश व आनंद निर्माण करायचा. हा सण साजरा करताना आतिषबाजीनेही आपण आनंद व्यक्त करतो. याची सांगड अध्यात्माशी अशी घालता येईल. परमात्मा शिवबाबा आपल्याला श्रेष्ठ असे श्रीमत देतात. श्रीमताचे प्रतीक म्हणजे चित्रातली उभी बाटली आणि फटाक्याचा बाण म्हणजे आपले मन–बुद्धीचे प्रतीक आहे. शिवबाबांच्या श्रीमतानुसार आपली मन–बुद्धी चालवली तर ती कल्याणकारी मार्गाने जाते. जर मनुष्यबुद्धीने म्हणजेच स्वमताने चालवली तर ती वेड्यावाकड्या जाणाऱ्या फटाक्याच्या बाणाप्रमाणे नुकसान करू शकते. यास्तव मन–बुद्धीला श्रीमताचा आधार आणि दिशा हवी हेच सत्य सार होय.

– प्रकाशक अमृतकुंभ

१. संपादकीय – भय इथले संपत नाही	२
२. राजयोगी (कविता)	४
३. दीपावली ... (कविता)	५
४. प्रभूरंगात – भाग २	६
५. चिंतन (गंगोदक–१)	८
६. पतित पावनी चैतन्य ...	९
७. दादी जानकीजींचा क्लास	१३
८. विजयादशमी एक ...	१५
९. शुभ दीपावली	१६
१०. अंत मति सो गति	१७
११. सदैव खुश रहा व सर्वांना आनंद वाटा	१८
१२. परम आनंददायिनी पवित्रता	२०
१३. 'जेथे जातो तेथे...तू माझा सांगाती'	२२
१४. मौन्य मुद्रा धरावी	२३
१५. हृदयरोगापासून बचाव करण्यासाठी ...	२४
१६. सनथ ते सनथकुमार...	२६

फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
बी. के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. सचिन उपाध्ये.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** – www.amrutkumbh.com.

(संपादकीय)

भय इथले संपत नाही

संपूर्ण जगाला अचानकपणे 'कोविड-१९' या विषाणूच्या आक्रमणाने ग्रासले. आजपर्यंत कुणी असा कधीही विचार केला नसेल, सगळे कार्यव्यवहार कळ दाबून यंत्र बंद करावे तसे बंद होतील. पण म्हणतात ना opportunity lies amidst crisis म्हणजे ऐन संकटाच्या भोवऱ्यातही त्यातून बाहेर पडण्याची संधी उपलब्ध असते. प्रश्न असतो 'ती' शोधण्याचा.

निश्चितच या घटनेचे दूरगामी पडसाद उमटणार आहेत. त्यामुळे या पडसादांचे विश्लेषण आपण भौतिक व आध्यात्मिक पातळीवर करून बघूया. प्रथम भौतिक पातळीवर काय परिणाम दिसून येतात ते पाहू.

प्रत्येक समस्येतून एक संधी जन्म घेत असते. या न्यायानुसार काही उद्योग आणि उद्योजकांना यात नवीन संधी सापडल्या. जसे, व्यक्तिगत सुरक्षेची साधने बनविणारे आणि वितरण करणाऱ्यांना अचानक मोठी संधी दिसून आली. चेहऱ्यासाठीचे विविध मास्क, हातमोजे, पॅकींगसाठी लागणाऱ्या वस्तू अशा गोष्टींचा वापर अचानक वाढला. अनेकजण घरी राहून काम करू लागले आणि संगणक, इंटरनेट व त्याच्याशी संबंधित साधनांचा खप तेजीने वाढला. घरपोच खाण्याचे पदार्थ पोहोचविणाऱ्या उद्योगांना बहर आला. अशी ही यादी मोठी करता येईल. पर्यावरणावरही काही प्रमाणात अनुकूल परिणाम दिसून आला. प्रदूषणाची पातळी घटली, वाहनांचे आवाज घटले. ही झाली सकारात्मक बाजू.

याउलट छोटे व मध्यम स्वरूपाचे अनेक उद्योग अचानक ठप्प झाल्याने त्यांची मोठी पंचाईत झाली. अनेकजण कर्जबाजारी झाले. या उद्योग क्षेत्रांत काम करणाऱ्यांना ५-६ महिने पुरेसे उत्पन्न मिळाले नाही मोठ्या उद्योग व्यवसायाने नोकरी करणाऱ्यांनाही याची झळ बसली आणि कुणाची नोकरी गेली, कुणाचे पगार घटले; पण सगळ्यांच्या मनांत चिंतेचे बीज मात्र घट्ट रुजायला लागले. हे पाहून कबिरांच्या दोह्यातील ओळ आठवते -

'फिकर सभी को खा गयी, फिकर ही सबका पीर (पीडा)'

ज्यांना नोकरी आहे, त्यांना नोकरीत, मान मोडून काम करण्यावाचून पर्याय नाही. ज्यांनी नोकरी गमावली त्यांच्यासमोर तर चिंतेचा डोंगर उभा राहिला असेल. त्याचबरोबर जे नव्याने पदवी घेऊन व्यावसायिक जगतात येऊ पाहत आहेत त्यांचीही कोंडी झाली आहे.

या सगळ्यातून चिंता, दुःख आणि भयाचा जन्म अपरिहार्य आहे.

वरकरणी पाहता काहीजण या गोष्टींना नकार देतील; पण कदाचित अंतरीचे प्रवाह मात्र भययुक्त असू शकतात. जरा ताप आला तर, आपल्याला कोविडच्या विषाणूने प्रभावित तर केले नाही ना अशी शंकेची पाल चुकचुकल्यावाचून राहत नाही.

हे सगळं पाहता आपल्याला जाणवतं- अध्यात्माच्या सत्य मार्गावाचून मनःशांती मिळणे जरा कठीणच आहे. पण मग नक्की काय करायचे? कुणी जप करतात, कुणी घरच्या घरीच आपल्या इष्ट देवतेसमोर बसून प्रार्थना, स्तोत्रं इत्यादी म्हणतात. कुणी प्राणायामालाच ध्यान-धारणेचा एक भाग समजून भयमुक्तीचा प्रयास

करतात. या सगळ्याच्या अगदी मुळाशी जाऊन पाहिलं तर आपल्याला दोन गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. १) मी आणि २) माझे. सगळा पसारा या दोन गोष्टींभोवती व्यापलेला आहे.

'मी' म्हणजे कोण? डॉक्टर, वकील, कामगार, धनाढ्य की अजून काही? पण ही सगळी झाली लेबले! लहानपणी मी एक अजाण बालक होतो, शाळा-कॉलेजात एक विद्यार्थी होतो... म्हणजे माझी ओळख कायमस्वरुपी एकच नाही. ती बदलत जाते. तरीही 'मी-मी' म्हणणारी, शरीराद्वारे कार्य करणारी सत्ता किंवा शक्ती कोण? गीतेचे तत्त्वज्ञान सांगते - आपण देह नसून एक चैतन्य आत्मा आहोत. आत्मा अजर, अमर आणि अविनाशी आहे. तसेच आत्म्याचे रूप एखाद्या चमचमणाऱ्या ताऱ्याप्रमाणे आहे. ज्योतिर्बिन्दूस्वरुप आहे. मात्र ही झाली तात्त्विक माहिती. याचा अभ्यास असणे म्हणजे अध्यात्म.

विषाणूचे परिणाम देहावर झालेच तरी मनावर होऊ नयेत याकरिता 'मी एक चैतन्य आत्मा आहे' हे भान विकसित करणे गरजेचे आहे. माणसाला सगळ्यांत जास्त भय मृत्यूचे वाटते. जर आपण या भयाच्या मुळाशी असलेल्या भावनेवरच काम करायला सुरुवात केली तर? म्हणजेच मी देह नसून एक चैतन्य आत्मा आहे, माझ्यात मन-बुद्धी-संस्कार आहेत आणि पवित्रता, प्रेम, शांती इत्यादी गुण माझे मुलभूत गुण आहेत. अशा प्रकारच्या चिंतनाने हळूहळू मीपणाचे अयथार्थ भान गळून पडू लागते आणि उच्चस्तरीय 'मी'पणाचे भान जागृत होऊ लागते.

मीपणाच्या उच्चस्तरीय भानाचा अर्थ तरी काय असावा? संतांनी म्हटले आहे - माझे मीपण गळो देवा म्हणजे काय? नुसतेच 'मी एक चैतन्य आत्मा आहे' या विचाराने हळूहळू कंटाळा येण्याची शक्यता आहे; पण जर का आपण असा विचार केला तर? मी प्रेमाच्या सागराचा अर्थात् परमेश्वराचा मुलगा आहे. या सृष्टीरुपी रंगमंचावर जणू एका अभिनेत्याप्रमाणे जीवन म्हणजे एक भूमिका बजावायला मी आलो आहे. माझे मूलस्वरुपातील घर म्हणजेच ब्रह्मांड आहे आणि योग्यवेळी मला त्या निजधामी परत जायचे आहे. ही झाली मीपणाची उच्चस्तरीय जाणीव. अशा अभ्यासाने देहभानात येऊन उत्पन्न होणारे मीपण गळून पडण्यास हातभार लागतो.

'माझे, माझे आणि मणाचे ओझे' अशी आपल्याकडे एक म्हण आहे. गमतीसाठी म्हणून अनेकजण म्हणतात - आपण काहीही घेऊन आलो नव्हतो आणि काहीही घेऊन जाणार नाही. पण मग अख्ख्या आयुष्यात माझे, माझे करून किती खटाटोप करतो? हा प्रश्न ज्याने-त्याने स्वतःला विचारायचा आहे. या डोळ्यांनी आपण जे जे पाहतो ते ते नश्वर आहे. ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू निश्चित आहे; मग तो देह असो वा वस्तू म्हणजेच घर, गाडी मालमत्ता इत्यादी प्रत्येक गोष्ट विनाशी आहे. जर प्रत्येक गोष्ट, देहासहित सगळंच आज ना उद्या सोडायचे आहे, तर मग त्यात मोह का ठेवायचा? मोहवश होऊन माझे माझे का म्हणायचे? प्रत्येकाने कधीतरी गंभीरपणे हा विचार आपल्या मनाच्या गाभ्यात उजळायला हरकत नाही. जर प्रांजळपणे या विचाराची खोली मापण्याचा प्रयत्न केला तर जाणवतं. खरच आपण उगाचच माझे, माझं असं म्हणून अनेक गोष्टी उराशी कवटाळून बसलो आहोत. फक्त स्थूल वस्तूच नव्हे तर अनेक प्रकारचे हेवेदावे, मान-अपमान, बऱ्या-वाईट प्रसंगांच्या आठवणी, अशा अनेक गोष्टी विनाकारण जतन केल्या आहेत. 'सुटकेलाही मन घाबरते' असे काहीसे आपले होऊन जाते.

एवढा ऊहापोह वाचल्यावर एखाद्याच्या मनांत येऊ शकते. हा तर निराशावाद किंवा निष्क्रियवाद झाला. म्हणजे जीवनांत काहीच मिळवायचे नाही का? कारण सगळे काही आज ना उद्या नष्ट होणार ही भावनाच मुळी नकारात्मक नाही का? भौतिकवादाची कास धरणारे लोक यामुळेच अध्यात्माला पलायनवाद समजण्याची गल्लत करतात. परंतु यथार्थ अध्यात्म आपल्याला कधीही असा पलायनवाद शिकवत नाही. उलटपक्षी सर्व

परिस्थितीत आनंदी रहायला शिकवते. प्रश्न आहे दृष्टी आणि दृष्टिकोन बदलण्याचा.

'मी देह आहे' हे समजण्याऐवजी मी आत्मा आहे. ही जशी दृष्टी बदलायची आहे, तसेच हा देह माझा, हे वैभव, नातलग माझे इत्यादी भान काढून टाकायचे. या जागी हे सगळे जणू काही परमेश्वराने मला भेट म्हणून दिले आहे असे समजायला सुरुवात करायची. म्हणजे जिथे जिथे 'माझे' शब्द येतो तिथे तिथे 'हे परमेश्वराचे' हा अभ्यास सुरू करायचा. अभ्यास म्हणजे नुसते तोंडाने बोलणे नव्हे. तसे तर आपण आरती म्हणताना गातोच की, 'त्वमेव माता च पिता त्वमेव'... पण भावनेच्या स्तरावर परमेश्वर खरोखरीच माझी आई किंवा वडील आहे हे अनुभवण्याचा प्रयत्न करतो का? याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. समर्थ रामदासांनी फार गोड ओळीत वर्णन केले आहे. –

सखा मानावा भगवंत, माता-पिता गणगोत।
लक्ष्मी विद्या धन वित्त सकळ परमात्मा।।

भावनेच्या पातळीवर सखोल जाणिवेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सगळंच देवाच्या मालकीचे असेल, तर आपल्या हातून काही गमावल्याचं दुःख होणार नाही. कसलेही भय राहणार नाही. जिथे मोह असतो तिथे बंधन असते आणि त्यातून भयाचा अनुभव होऊ शकतो. म्हणूनच गीतेच्या अठराव्या अध्यायात – नष्टोमोहः स्मृतिर्लब्धाची शिकवण दिली आहे. जीवनाच्या सगळ्या प्रवासाचे सारच या एका श्लोकांत सामावले आहे.

'स्वतःला आत्मा समजणे व निराकाराचे ध्यान करणे' म्हणजेच राजयोग होय. अशा अभ्यासानेच भयाची समाप्ती होऊ शकते. भयरुपी रावणाचे या ज्ञानाग्नीत आणि योगाग्नीत दहन करणे राजयोगाद्वारेच शक्य आहे. जेव्हा भय नष्ट होते तेव्हा आनंदी आनंद म्हणजेच दिवाळी साजरी होऊ शकते. राजयोगाचा सखोल अभ्यास करायचा असल्यास ब्रह्माकुमारी संस्थेच्या नजीकच्या सेवाकेंद्रात जाऊन अधिक लाभ घेता येईलच. आमच्या सर्व वाचक सदस्यांना येणारा काळ भयमुक्त जावो हीच सदीच्छा!

***

राजयोग

राजयोग सांगतो निरंतर आठवा शिवबाबांना
भोलेनाथ तो भाग्य उजळी एकवीस जन्मांचे ।।धृ।।

स्वतःस आत्मा मानून करूया आठवण परमात्म्याची
उठता-बसता कार्यारंभी स्मृती शिवबाबांची
विकर्म विनाश होऊन खात्री मिळते देवपदाची
राजयोगाच्या शिडीने घडते फलप्राप्ती श्रेष्ठत्वाची ।।१।।

क्रियायोग, हठयोग ते देती शरीर स्वास्थ्य सकला
मन-बुद्धीला विवक्षित लाभ तयानेच झाला
अतींद्रिय सुखाची उधळण करी हा राजयोग
पावन बनवून चावी देई नव दुनियेची वैकुंठाची ।।२।।

आत्मा इंद्रियांचा राजा, पुण्य साठवी कर्माचे
मानव होई देव-देवता, फलित हे राजयोगाचे
पिता सखा गुरू होऊन ईश्वर शमवी तृष्णा आत्म्याची
'राजयोग' योगांचा राजा, मिळे मान्यता विश्वाची ।।३।।

– ब्र. कु. वसंत
कागल, कोल्हापूर

दीपावली आणि नवीन वर्षाच्या आपणांस शुभेच्छा !

ही दीपावली आपण स्मरणीय बनवू, प्रभुप्रेमाची ज्योत जागवू
होवो समाजपरिवर्तन यामुळे, मिटो आपदा अन् तेज उसळे
ईश्वरी ज्ञान संपत्तीचा प्रकाश घरोघरी पसरू दे
नववर्षाच्या झळाळीने नवसृष्टी निर्माण होऊ दे

श्रेष्ठ विचाराने जीवन दिव्य गुणांची खाण बनवू
व्यर्थ आता समाप्त करू समर्थ होऊन प्राणदान करू
सगळे मनुष्यात्मे सदा प्रसन्न राहो, १२ महिने, ३६५ दिन आनंदित राहो
८७६० तास उत्साहित राहो, ५२५६०० मिनिटे प्रफुल्लित राहो,
३१५३६००० सेकंद अंतःकरण निर्मळ राहो, सर्वांसाठी श्रेष्ठ भावना राहो
असे आपुले वर्ष २०२१ राहो

दिव्या गुणांनी संपन्न रहा, वाईटापासूनी दूर रहा
शिव पित्याशी तार जोडोनि रोग-शोकाला दूर करा
प्रत्येक शंकेचे समाधान करून पावलागणिक संपन्न बना
असे आपुले वर्ष २०२१ होवो

दोषदृष्टी परिवर्तन करा, जीवन जगण्याची कला शिका
आनंदाने भरपूर रहा, ईशस्मृतीने नष्टचर्य घालवा
आत्मनिर्भर होऊन काही चांगली कमाल करा
असे आपुले वर्ष २०२१ राहो

आपणां सर्वांना हार्दिक शुभेच्छा, स्वचिंतनात तुम्ही हाऊसफुल बना
सकारात्मक विचारांनी जीवन ब्युटीफुल बनवा
प्रभुप्रेमाने पॉवरफुल बना जीवनयात्रेत वंडरफुल बना
हीच आमुच्या मनीची कामना

– राजयोगिनी ब्र. कु. गोदावरी दीदी,
प्रकाशिका, अमृतकुंभ

प्रभूरंगात रंगूनी

(भाग २)

निश्चयबुद्धी विजयंती

ब्र.कु. मिनल, ठाणे (प.)

आपल्या सुजलाम सुफलाम भारत देशात साजऱ्या होणाऱ्या उत्सवांत, सण-समारंभांत विविध रंगांच्या कलाकुसरीचा आविष्कार पाहायला मिळतो. निराकार परमात्म्याला सगुण, साकार रूपात शोधताना आपण देव-देवतांच्या मूर्तींनाही सुंदर रंग देऊन सजवलं. कुठे शेंदुराचा लेप ल्यालेला हनुमंत तर कुठे निळा सावळा श्रीहरी. अनन्य भक्तांना जे रूप भावलं त्याचा त्यांना साक्षात्कार झाला. पण परमात्म्याचं सत्य स्वरूप काय, तो कोण, कसा, कुठे राहतो? ना याचा शोध संपला, ना जग सुखी झालं. थोडयाफार फरकाने विविध धर्मांतही ज्योतीस्वरुप परमात्म्याची आठवण मागे पडून धर्मस्थापक, संत महात्म्यांचं, कर्मकांडाचं प्रस्थ वाढलं. ते न पटल्याने अनेकांचा धर्मावरील विश्वास कमी झाला. युरोप-अमेरिकेसारख्या प्रगत खंडांत व्यक्तिस्वातंत्र्याच्या नवनवीन कल्पना रुजू लागल्या; पण ईश्वराविषयी आंतरिक ओढ असलेला, सत्य ज्ञान जाणून घेण्याची इच्छा असलेला एक वर्गही होता.

१९५० च्या दशकात एका श्रीमंत ब्रिटिश घराण्यात जन्म झालेल्या 'रिटा डिनीस लॉरेन्स' म्हणजेच बी.के. सिस्टर डिनीस या त्यांपैकीच एक. अध्यात्माविषयी चिंतन करणाऱ्या, स्त्री-सशक्तीकरणासाठी जागरूक असणाऱ्या, डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत अमान्य करणाऱ्या सिस्टर डिनीस लहानपणापासूनच वेगळ्या, स्वतंत्र विचारांच्या होत्या. युरोपात जन्म झाला असला तरी भारताशी, तेथील देव-देवतांच्या परंपरेशी आपला जवळचा संबंध आहे, असे संकेत देणारे काही प्रसंग त्यांनी अनुभवले. एकदा भारतीय देवीच्या मूर्तीचा साक्षात्कार करत असताना, स्वत:ला त्या (देवता) स्वरुपात मंदिरात आसनस्थ झालेलं दृश्य त्यांनी पाहिलं. ख्रिश्चन धर्माच्या असूनही 'आपला (आत्म्याचा) पुनर्जन्म होतो..' यावर त्यांचा विश्वास होता. प्रत्यक्ष आयुष्यातही भारताविषयी असलेली ओढ स्पष्ट दिसून येई. आधुनिक पाश्चात्य पोशाखापेक्षा संपूर्ण भारतीय पेहरावालाच त्यांची प्रथम पसंती असे. कुटुंबाचा, समाजाचा रोष पत्करून जमेल तेव्हा आवडीने साडी नेसत.

१९७१-७२ मध्ये लंडनला त्या सी.बी.सी (Canadian Broadcasting Corporation) दूरदर्शन विभागात कार्यरत होत्या तेव्हाची गोष्ट. सुमारे वर्षभर त्यांना एक आवाज ऐकू येई 'हॅलो, तुला योग शिक्षिका बनायचं आहे..' योग काय असतो? कोण शिकवेल?' खूप विचार चालायचे. त्या काळात भारतीय अध्यात्म, पातंजल योग शिकवण्यासाठी महर्षी महेश योगींसारख्या अनेक गुरूंनी परदेशात आश्रम उघडले होते; पण तिथे आकारली जाणारी भरमसाठ फी, सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरची होती. 'सत्य' हे शाश्वत असून सर्वांसाठी एकच असतं, ती काही बाजारात विकत मिळणारी वस्तू नव्हे असं त्यांना ठामपणे वाटे. अशातच रोज रात्री त्यांच्या स्वप्नात एका वेगळ्याच भाषेत (हिंदीत) पानभर लिहिलेला कागद येई. यात माझ्यासाठी खूप आवश्यक सूचना आहे असं जाणवून त्या वाचायचा प्रयत्न करायच्या; पण व्यर्थ. काहीच आकलन होत नसे. कालांतराने तेच लिखाण इंग्लिशमध्ये दिसू लागलं तेव्हा खूप आनंद झाला; पण लिखाण वाचता

आलं तरी त्याचा अर्थ समजेना. आता योग शिकण्याची फार ओढ वाटू लागली.

एकदा वाहनाची साफसफाई करत असताना हात काळे होत होते. त्यांच्या मनांत विचार आला 'ओ गॉडफादर, माझ्याकडे सोनं नाणं काही नाही. मी जी आहे, जशी आहे तुझीच आहे..' वाटलं कुणीतरी ते खरंच स्वीकार केलं. मग ईश्वराशी आणखी संवाद साधला, तू कोण आहेस, कसा आहेस मला जाणून घ्यायचंय.. तेव्हा त्या खोलीत चार फुटांवर एक सुंदर ज्योतीर्बिंदू चमकत असलेला त्यांना दिसला. त्यातून चुंबकीय आकर्षण असणारी, आनंददायी, शक्तिशाली किरणं बाहेर पडत होती. नाही! नाही! हा परावर्तीत प्रकाश नव्हे, एखादी वस्तूही नाही. कुणी व्यक्ती आहे; पण अशरीरी.. हा बिंदू माझ्याकडे पाहून हसतोय. जणू सांगतोय मी आलो आहे. धार्मिक मान्यतेप्रमाणे त्यांनी त्या प्रकाशबिंदूला विनंती केली हे सगळं काय आहे ते समजावण्यासाठी कृपया एक पादरी पाठवाल का? इतक्यात जवळजवळ २० फूट उंच, लांब काळे केस असलेली, चेहऱ्याने भारतीय वाटणारी एक व्यक्ती भिंतीतून निघून हळूहळू खाली उतरू लागली. दिव्य प्रकाशमय देह असणाऱ्या त्या व्यक्तीचे डोळे एका अलौकिक तेजाने चमकत होते. थोडया वेळाने ते सारं अदृश्य झालं. काहीतरी अद्भुत घडतंय आणि यापुढील आयुष्यात आणखी सुंदर अनुभव येणार आहेत असं सिस्टर डिनीसना वाटू लागलं.

काही दिवसांनी कुणीतरी त्यांच्या कार्यालयातील टेबलवर 'राजयोग', 'फोन नंबर' आणि 'फ्री' एव्हढंच लिहिलेली छोटी चिठ्ठी ठेऊन गेलं. त्यातील 'फ्री' शब्द वाचून हाच सत्य राजयोग आहे असा अंतर्मनाने कौल दिला. त्यावर्षी म्हणजे १९७४ साली लंडनमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विदयालयाचं केंद्र एका छोट्याशा घरात होतं. दारावर असलेली 'ज्योती निवास' अशी पाटी वाचून आणि आतून येणारा अगरबत्तीचा सुवास ओळखून डिनीसबेननी बेल वाजवली. आत कोणतही फर्नीचर नाही, केवळ सतरंजी अंथरलेली होती. एक लाल तेजस्वी गोळा, शांती – पवित्रता – समृद्धी असं लिहीलेले तीन पांढरे किरण, पृथ्वी (विश्व) रेखाटलेलं मोठं चित्र ठेवलेलं होतं. दुसरीकडे विष्णू चतुर्भुज रूपाचं त्याहून मोठं चित्र होतं. ते पाहून मेडिटेशन शिकण्यासाठी आपण योग्य ठिकाणी आलोय ना, असा त्यांना प्रश्न पडला; पण खोलीतले तरंग (वायब्रेशन्स) खूप छान वाटत होते. काही वेळाने एक लहानशी बहीण आली व तिने राजयोग मेडिटेशन शिकवायला सुरूवात करण्यापूर्वी 'तुम्ही ईश्वराला मानता की मानत नाही?' असा प्रश्न विचारला. अंतर्मुखी होऊन ज्या क्षणी सिस्टर डिनीसनी 'हो' म्हटलं, त्या क्षणी त्यांच्या ईश्वरी भाग्याचं दार उघडलं. ५५ मिनिटांत आत्म्याच्या परिचयाचा पहिला धडा पूर्ण झाला. कोर्स घेणाऱ्या टिचर होत्या जयंतीबेन.

दुसऱ्या दिवशी त्यांनी परमात्म्याविषयी दोन मोठी विधानं डिनीसबेनना ऐकवली. एक म्हणजे 'परमात्मा सर्वव्यापी नाही' आणि दुसरं 'God has come – शिव परमात्म्याचं दिव्य अवतरण झालं आहे' हे ऐकत असताना डिनीसबेनना आपल्या घरात पाहिलेल्या ज्योतीर्बिंदू व देवदूताच्या साक्षात्काराची आठवण येत होती. 'कोण म्हणतं परमात्मा सर्वव्यापी आहे? या सृष्टी रंगमंचावर मी आलो असल्याचं त्यानेच मला सांगितलं होतं' डिनीसबेन ठामपणे म्हणाल्या. एका विदेशी, ख्रिश्चन धर्माच्या व्यक्तीला इतक्या सहजपणे पक्का निश्चय झाल्याचं पाहून जयंतीबेनना आश्चर्य वाटलं. त्यानंतर जयंतीबेननी त्यांना मेडिटेशन करवलं. दृष्टी घेत असतानाच शांत, पवित्र आत्मस्वरुपात स्थिर होऊन त्या दिव्य प्रकाशाच्या परमधामात पोचल्या.

आज मी तुमची ओळख एका योगिनीशी करून देणार आहे. चला माझ्याबरोबर सृष्टीचक्राचा धडा शिकण्यासाठी जयंतीबेनच्या मागून डिनीसबेननी खोलीत पाऊल टाकलं आणि पाहतात तो काय! साक्षात्कारात त्यांच्या घराच्या भिंतीतून अवतरलेली भारतीय व्यक्तीच तिथे बसली होती,

(पान क्र. १४ वर)

चिंतन

गंगोदक : १

ब्र.कु मीना, ठाणे (प.)

प्राचीन काळापासून पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनोपयोगी वस्तू म्हणून तर आहेच; पण आत्मोन्नतीचे एक साधन म्हणूनही पाण्याकडे पाहिले गेले आहे. भारतात गंगेच्या पाण्याला सर्वात जास्त महत्त्व दिले गेले व त्याखालोखाल इतर नद्यांच्या पाण्यालादेखील तितकेच महत्त्व दिले आहे. बहुतांश सर्व धर्मात पाण्याचे महत्त्व याच प्रकारे मानले गेलेय. इस्लामपंथीय लोक मक्केला असलेल्या एका जलाशयाचे वा विहिरीचे पाणी पवित्र मानतात. त्याला 'जमजमका कुआँ' असे संबोधले जाते. मुळांत 'जमजम' याचा अर्थ आहे पाणी. ख्रिश्चन धर्मीयांतील कॅथलिक पंथात बाप्तिस्मा देताना डोक्यावर अभिमंत्रित पाणी शिंपडतात व समजतात, आता या व्यक्तीस ख्रिश्चन धर्मात घेतले गेले.

भारतीय संस्कृतीत कुठल्याही ठिकाणच्या पाण्याला गंगेचीच उपमा देतात. नाशिकजवळची गोदावरी नदी अनेकांसाठी दक्षिणगंगा आहे. संस्कृत साहित्यात सुभाषितांच्या माध्यमातून छान छान विचार प्रकट केल्याचे आढळते. आता हे सुभाषितच पहा–

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ।
पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमः।।

सरलार्थ – गंगा पाप नाश करते, चंद्र ताप निववितो, त्याचप्रमाणे कल्पवृक्ष दैन्य (दीनता) निवारतो; पण साधुसंगत या तिन्ही गोष्टी घडवून आणते.

पाणी आपले पाप कसे काय धुऊ शकेल? ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट आहे. पाप–पुण्याचा प्रभाव किंवा लेप तर आत्म्यावर चढतो, शरीरावर नाही, म्हणूनच पापात्मा, दुरात्मा, पुण्यात्मा अशी विशेषणे आपण वापरतो. तसेच गीतेच्या तत्त्वज्ञानानुसार आत्म्यास जल भिजवू शकत नाही, अग्नी जाळू शकत नाही, मग आत्म्यावर चढलेली पुटें पाण्याने कशी धुतली जातील? गंगेच्या पाण्याने शरीर धुतल्यावर चित्तवृत्ती शुद्ध झाल्या असत्या तर न्यायालये, पोलीस, तुरुंग ही यंत्रणाच अनावश्यक ठरली असती. एकदा का वृत्ती शुद्ध झाली की कुणी चोरी–मारी करणार नाही; पण तसे घडत नाही.

मथितार्थ : मनाचा किंवा आत्म्याचा मळ धुण्यासाठी स्थूल पाणी नाही, तर काहीतरी सूक्ष्म गोष्टीची गरज आहे. अशा चिंतनातूनच कबिरांनी लिहिले असेल का?

गंगाजल से तन धोया, मन वैसा ही मैला।
कहत कबीर सुन भाई साधो क्या तीरथ क्या मेला।।

(क्रमशः)

***

सुविचार

संकटापेक्षा संकटाची भीतीच माणसाचा अधिक घात करते.

(ब्रह्मावत्सांकरिता)

पतित पावनी चैतन्य ज्ञान गंगा दादी आत्मइंद्राजी

ब्रह्माकुमार हेमंत, शांतिवन (आबूरोड)

हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व नाशिक येथे कुंभ मेळ्यांमधे भक्तीचे विराटरुप पाहून आश्चर्याने आपण थक्क होतो. हे कुम्भ मेळे संगमयुगातील आत्मा-परमात्म्याच्या मंगल मिलनाचेच यादगार होत! कल्पांताच्या समयी ज्ञानसागर शिव परमात्मा जेव्हा ब्रह्मा बाबांच्या नरदेहात अवतरित होतात, तेव्हा ब्रह्मा-मुखकमलाद्वारे प्राप्त झालेल्या ज्ञानजलाने आत्म्यास शुध्द करणाऱ्या ब्रह्माकुमारी बहिणीच खऱ्या अर्थाने ज्ञान गंगा ठरतात. ह्या विश्वकल्याणी स्नेह सरितांमध्ये अशाच एक अद्वितीय अद्भुत पावन गंगा होत्या, राजयोगिनी दादी आत्मइंद्राजी! सन १९२६ मध्ये सिंध हैदराबाद येथील एका धार्मिक कुटुंबात दादीजींचा लौकिक जन्म झाला. आई वडिलांनी त्यांना नाव दिलं,'गंगा'. भक्तिमार्गात अशी मान्यता आहे गंगास्नान केल्याने जन्मोंजन्मीची पापं धुतली जातात. असंच दादींच्या परिसासारख्या संगतीत पापमुक्त झाल्याचा अनुभव होत असे. त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या विषय वासना क्षणार्धात लोप पावत. दादींचे अलौकिक सानिध्य सामान्य माणसालाही परमात्म्याच्या पावनतेची प्रचिती व दैवी शक्तीचा प्रत्यय देणारे होते. 'जैसा नाम वैसा काम' ह्या म्हणीप्रमाणे प्रेमाच्या पावन पाण्याने मानवास पवित्र करणाऱ्या दादी, चैतन्य पतित पावनी ज्ञान गंगा सिध्द झाल्या. ईश्वराने त्यांना तसे वरदानच दिले होते जणू. पिताश्री ब्रह्मा बाबा, दादींना प्रेमाने 'हर गंगे' म्हणत, तर शिवबाबांनी त्यांना दिलेलं अव्यक्त नाव होतं, 'आत्मइंद्रा'.

राधे कृष्णावर लुब्ध असलेल्या दादींना बालपणापासूनच सच्ची गोपिका बनण्याचे वेड लागले होते. हृदयी असलेले कृष्णप्रेम, आकर्षण दादींना ओम मंडळीत खेचून घेऊन जाण्यासाठी कारणीभूत ठरले. कमलसुंदरी दादींच्या आग्रहामुळे त्या सत्संगात गेल्या व तिथे गेल्या-गेल्याच त्यांना श्रीकृष्णाचा दिव्य साक्षात्कार झाला, त्यामुळे मोठ्या ओढीने त्या रोज सत्संगात जाऊ लागल्या. त्यावेळी नुकतेच ब्रह्मा बाबांनी लहान मुलांसाठी वसतिगृह उघडले होते. लहान वयांत अवघ्या बाराव्या वर्षी दादी वसतिगृहात दाखल झाल्या. परंतु पवित्रतेच्या व्रताचे मर्म व महत्त्व न जाणणाऱ्या समाजकंटकांनी कट्टर विरोध केला. त्यांचा अढळ निश्चय व नारायणी नशा पाहून दादींच्या वडिलांचा गैरसमज झाला की दादा लेखराज यांनी त्यांच्यावर काहीतरी जादूटोणा केलाय. म्हणून एका सुरदासांद्वारे (अंध-व्यक्तिद्वारे) जादू उतारविण्याचा प्रयत्नही केला. परंतु दादींच्या दृढतेपुढे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. ईश्वरी ज्ञान मार्गावर पाऊल पुढे टाकताना नातेवाईकांनी खूप अडथळे उभे केले, वाटेत काटे पेरले, परंतु ईश्वर कृपेने ते शूल (काटें) फूल बनले. दादी परमात्म प्रेमाच्या रंगात अशा रंगल्या होत्या की रस्त्यातले दगड-धोंडे सहज दुभंगून मऊ माती झाले.

प्रभूभेटीसाठी सहा महिने बैचेन होऊन, पाण्याविना माशासारख्या त्या तळमळत राहिल्या. त्या वेळेस दादी श्रीमद्भागवतमधे वर्णन केलेल्या गोप-गोपिकांच्या कहाण्या सारख्या आठवत बसत व सारखा एकच विचार करीत की श्रीकृष्णाची मुरली ऐकताना गुंगून जाणाऱ्या गोपिकांचे नातेवाईक त्यांना मुरली ऐकण्यासाठी अडवित, तेव्हा त्यांच्या कानी बासरीचे मंजुळ स्वर का ऐकू येत नसत? त्यांना मुरलीची मधुर

तान का आकर्षित करीत नसे? इत्यादी इत्यादी....पण जेव्हा ओम मण्डळीत दादी, ज्ञान मुरली ऐकायला जाऊ लागल्या, तेव्हा त्यांना हेच रहस्य उलगडले की त्या सौभाग्यशाली गोपिका दुसऱ्या कुणी नसून, त्या स्वतःच आहेत आणि मग दादींना हा अलौकिक नशा चांगलाच चढला. त्यामुळे जेव्हा जेव्हा लौकिक नातेवाईक त्यांना धमक्या देत, मारहाण करुन त्यांच्यावर अत्याचार करत, त्यांना सळो की पळो करीत, तेव्हा त्या परमात्म आठवणीमधे रममाण होऊन आपल्याच मौलाई मस्तीत मस्त होऊन जात. अशा अवस्थेत एकदा अचानक अफ्रीकेहून त्यांचे जेष्ठ बंधू आले व आपल्या लाडक्या बहिणीची अशी केविलवाणी स्थिती व दुर्दशा पाहून ते वडिलांना म्हणाले,'सत्संगामध्ये जाण्यात अशी कोणती वाईट गोष्ट आहे?' अशाप्रकारे वडिलांची समजूत घालून मोठ्या भावाने बहीणीची सोडवणूक केली आणि दादी पुन्हा ज्ञानामृत प्राशन करण्यासाठी जाऊ लागल्या.

काही दिवसांपर्यंत दादींची ही रुहानी यात्रा सुखरुप चालत राहिली. मात्र एके दिवशी दादींच्या आईच्या मनात विचार आला की जर मुलीचे लग्न केले तर तिचे मन संसार प्रपंचात लागेल. परंतु मन-वचन-कर्माने पवित्रतेचे व्रत घेतलेल्या दादींनी ज्ञान-मीरा बनण्याचा ठाम निश्चय केला होता. त्यांनी बंधनात गुरफटण्याऐवजी लग्नास स्पष्टपणे नकार दिला, तेव्हा दादींच्या वडिलांच्या तळपायाची आग मस्तकी पोहोचली. त्यांनी दादींना साखळदंडाने बांधून अंधार असलेल्या खोलीत डांबून ठेवले आणि हातापायात बेड्या ठोकल्या. परंतु दादी, तहान-भुकेने व्याकूळ न होता भगवतांच्या आठवणीत इतक्या मग्न झाल्या की काय आश्चर्य! त्यांना बासरी वाजवत असलेल्या श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाला व आवाज आला, 'प्रिय आत्मन्, भिऊ नकोस, मी तुझ्यासाठी आलोय.' हे ऐकता क्षणीच त्याचं देहभान हरपले आणि तहान भूकही नाहिशी झाली. अन्न-पाण्याविना दादींचा देह दुर्बल झाला होता. तरीही त्यांना साक्षात्काराने आत्मिक शक्तीचा अनुभव होत होता. तीन दिवसानंतर वडिलांनी दरवाजा उघडला व क्रोधाने विचारले, 'आता तर लग्न करशील ना?' परंतु दादी निर्भय होऊन म्हणाल्या, 'मी ऐकवेळ मरुन जाईन, पण कोणत्याही किमतीवर लग्न करणार नाही.' तेव्हा पित्याने आणखीच रुष्ट होऊन दादींना परत साखळदंडाने बांधून ठेवले.

जेव्हा गंगे दादींवर होणाऱ्या अत्याचाराची कहाणी ओम मण्डळी पर्यंत पोहचली, तेव्हा दादी प्रकाशमणी त्यांना भेटायला गेल्या. दादींच्या घराशेजारीच त्यांच्या मावशीच्या घराच्या पहिल्या मजल्यावर भाडेकरू राहत असत. त्यांच्या छतावर जाऊन चिमणीतून (धूर बाहेर जाणाऱ्या धुराड्यामधून) प्रकाशमणी दादी त्यांच्याशी संवाद साधत. तेव्हा गंगे दादीना अनुभव येई की जणू काही रामसेवक हनुमानच गुप्तरुपाने, त्या खऱ्या सीतेला शिवाचा (रामाचा) संदेश ऐकवत आहेत. अशा प्रकारे दादींना दोन महिने साखळदंडानी बांधून ठेवले. नेमक्या ह्याच काळात परदेशातून दादींची बहीण आली व दादींचे हाल पाहून दुःखी झाली. कसेबसे आई-वडिलांशी प्रेमाने संवाद साधून साखळदंड, बेड्यांमधून मुक्त केले व आपल्या घरी घेऊन गेली. तेव्हा दादी पुन्हा सत्संगात जाऊ लागल्या.

परंतु ओम मण्डळीच्या विरोधकांनी पुन्हा कन्या मातांच्या नातेवाईकांना भडकवून उपोषण करण्यास भाग पाडले. त्यांनी ओममण्डळीविरुध्द कोर्टात केसही केली. तेव्हा ब्रिटिश सरकारसुध्दा गोंधळात पडले की माता बहिणींवर एवढे अत्याचार का होत आहेत? त्यांनी न्यायनिवाडा करण्यासाठी लोखंडाचे एक धनाढ्य व्यापारी 'शिवरतन मोटा' यांना मध्यस्थ बनवले व माता कन्यांना विचारायला सांगितले की, 'ओममण्डळीत त्यांना काय प्राप्त होते? सत्संगात कोणती शिकवण दिली जाते? तिथे स्वयं परमात्मा पिताश्री ब्रह्मा बाबांच्या द्वारे कशा प्रकारे मानवास देव बनण्याचे

शिक्षण देत आहेत?' तेव्हा तिथे तीन दिवस राहून मनोहर दादी, कमलसुंदरी दादी यांनी ह्या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. चौथ्या दिवशी, खूप विचार करुन त्यांनी निर्णय केला की ह्या माता बहिणी जनकल्याणासाठी निमित्त बनल्या आहेत. त्यांचा उद्देश शुध्द आहे आणि त्याच खऱ्या देवी आहेत. म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारे विरोध करू नये. ही बातमी सर्व वृत्तपत्रांमध्ये छापली गेली. 'जिसका साथी हो भगवान उसे क्या रोके आंधी और तुफान!' ह्या म्हणीप्रमाणे ज्यांचा पाठीराखा स्वयम् परमात्मा होता, शेवटी त्यांचाच विजय झाला आणि दादींच्या आई-वडिलांनीही आनंदाने सुट्टी दिली. अशा प्रकारे त्या बंधनमुक्त झाल्या.

सिंध हैद्राबाद येथून आबूपर्वत येथे आल्यावर ब्रह्मा बाबांनी दादीजींना सेवेसाठी पाठविले. आबूभ्रमण करण्यासाठी आलेल्या ऑफिसरने दिल्ली येथे २६ जानेवारीला प्रवचन करण्यासाठी निमंत्रण दिले, तेव्हा गंगे दादी व मनोहर दादींच्या जोडीने दिल्लीत जाऊन ईश्वरी सेवेचा श्रीगणेशा केला. नंतर चांदणी चौक येथील गौरीशंकर मंदिरामध्येही त्यांना प्रवचन करण्यासाठी निमंत्रण मिळाले. बाबांच्या आज्ञेने स्वामी शिवानंदजींच्या निमंत्रणावर, ऋषीकेश येथील 'विश्वशांति संमेलनात' दादींनी भाग घेतला. तेव्हा नुकत्याच जपानमध्ये झालेल्या सर्वधर्म संमेलनात भाग घेऊन परतलेली एक व्यक्ती, दादींचे प्रवचन ऐकून खूप प्रभावित झाली. त्याने जपानमध्ये होणाऱ्या द्वितीय सर्वधर्म संमेलनाच्या आयोजकांना लिहिले की, 'ब्रह्माकुमारी संस्था खूप चांगली आहे. त्यांना तुम्ही निमंत्रण द्या.' तेव्हा दादी प्रकाशमणी, दादी रतनमोहिनी व दादा आनंदकिशोर यांनी जपानला जाऊन विदेश सेवेचे बीज पेरले. अशा प्रकारे गंगे दादीच विश्वसेवेसाठीही निमित्त बनल्या. त्यानंतर त्या दोन महिने कोलकाता येथे सेवार्थ राहिल्या. तेथून ही ज्ञान गंगा बनारस व अलाहाबाद येथील आत्म्यांना ईश्वरी ज्ञान-योगाने पावन करत कानपूरला स्थिरावली. तिथे अंतिम श्वासांपर्यंत दधीची ऋषीप्रमाणे ईश्वरी सेवांचा विस्तार केला. दादी उत्तर प्रदेश झोनच्या प्रमुख होत्या. त्यासोबत धार्मिक प्रभागाच्या अध्यक्षा बनून, सर्वत्र आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश पसरवला.

कानपूर क्षेत्र संचालिका विद्या दीदी दादींच्या सोबतीचा अनुभव अशा प्रकारे सांगतात, 'दादी आम्हाला प्रत्येक गोष्टीचे मूल्य समजावून सांगत - सुईचे आपले महत्त्व आहे, तर तलवारीचे आपले! व्यक्ति असो वा वस्तू सर्वांचे काही ना काही मोल असते. जितके मोठ्याला महत्त्व देतो तितकेच छोट्यालाही महत्त्व दिले पाहिजे. त्या काळांत सेवाकेंद्रावर एक भाऊ वेळी-अवेळी यायचा, डोक्याने थोडा कमजोर, मंदबुध्दि होता. तो तन, मन, धन इत्यादी द्वारे काही सेवा करत नसे, तसेच व्यवस्थितपणे उठत बसतही नसे, तेव्हा मी त्याला म्हणत असे, 'दयाशंकर नीट बस.' तेव्हा दादी मला म्हणत, 'त्याला हीच गोष्ट प्रेमानेही सांगू वा बोलू शकतेस. म्हणून त्याच्याशी प्रेमाने बोल, तेव्हा मी म्हणत असे, 'ही व्यक्ती कोणत्या कामी येईल? त्यावर दादी म्हणत, 'वेळेवर खोटं नाणंही कामी येतं, म्हणून सर्वांची कदर कर.' त्या वेळी एका शिख भावाच्या घरांत सेंटर भाड्याने होतं. जेव्हा इंदिरा गांधीजींची हत्या झाली, तेव्हा लोकांनी शिखाच्या घरालाही आग लावली. त्यामुळे आम्हाला हॉटेलमधे राहावे लागले. तशात दंग्यामुळे संचार बंदी लागू झाली. दयाशंकर भाई आर्मीमध्ये सर्व्हिस करत असल्याने त्याच्याजवळ परिचयपत्र होते. कर्फ्यूमधे कुणी मदत करू शकत नव्हते. मात्र तो भाऊ सायकलवर डाळ, तांदूळ तर कधी मिलीट्री कैन्टीनमधून आवश्यक वस्तूही आणून देत असे.

दादी नेहमी म्हणत, 'वेळेचा क्षण आणि अन्नाचा कण' कधीही व्यर्थ जाऊ देता कामा नये. दादी भोजनानंतर जेवणाची उष्टी भांडी धुतल्यावर निघालेले पाणी गाळणीने गाळत व त्यातून निघालेले अन्नाचे कण पानांमध्ये ठेवून, एखाद्या झाडाच्या बुंध्यापाशी ठेवायला पाठवत. जेणेकरुन ते अन्न, मुंग्या, चिमण्या व खारीला खायला

मिळेल. अन्नाला देवताही मानले जाते, म्हणून अन्नाचा कणही गटारात वाहून जाता कामा नये. दादी नेहमीच शिकवण देत, 'आपण इथे संस्कार बदलायला आलेलो आहोत, म्हणून कुणी अपमान केला आणि आपणही त्याचा अपमान करुन त्यांचा तिरस्कार केला, तर आपले संस्कार श्रेष्ठ नाही होणार.' एखाद्या मातेचा पती तिला ज्ञानमार्गात विरोध करीत असेल तर दादी त्या मातेऐवजी तिच्या पतीचे प्रेमाने गुणगान करुन त्याचे मन परिवर्तन करीत आणि कुटुंबाला तुटण्यापासून वाचवत. दादींमध्ये 'कम खर्च बाला नशीन' हा संस्कार पुरेपूर भरलेला होता. अंतिम समयी जेव्हा त्या आजारी असताना रुग्णालयात होत्या, तेव्हा स्वतःवर खर्च न होऊ देता, हॉस्पिटलमध्ये एखादी अति गरजेची वस्तू देण्यासाठी दादींनी निर्देश दिला.

गंगे दादींचे जीवन म्हणजे त्याग, तपस्या व सेवेचा त्रिवेणी संगम होता! अशा साक्षात् प्रेमाच्या मूर्तिमंत देवीच्या सहवासाचे सौभाग्य मज आत्म्यासही लाभले. त्यांच्या जवळ बसल्या-बसल्या चंद्राच्या शीतलतेचा अनुभव होत असे. त्यांचे मुखमण्डल नेहमीच अलौकिक तेजाने चमकत असे, त्यांच्या वाणीतून मधमाशांच्या पोळयातून टपकणाऱ्या मधासारखा गोडवा टपकत असे. मितभाषी दादींच्या रुहानी दृष्टीत क्षणभरात आपले बनविण्याची जादू होती. मी जेव्हा दादींना भेटलो, त्या वेळेस नुकतीच सिंधी भाषा लिहायला व वाचायला शिकलो होतो. म्हणून दादींना प्रेमाने सिंधी मधे पत्र लिहित असे, त्या पत्रपुष्पातली प्रेमरुपी फुलं मोठ्या मनानं आनंदपूर्वक स्वीकारीत, स्नेहपत्र वाचत आणि मधुबनला आल्यावर दिलदार होऊन बालमनाचं कौतुकही करीत. वेळेला विलक्षण महत्त्व देत, कुणी पत्राद्वारे सेवेसंबंधी काही विचारपूस केली किंवा एखादी गोष्ट विचारली तर, हलगर्जी न करता तत्काळ (अविलंब) पत्राचे उत्तरही देत. दादीजी एक ओजस्वी धाराप्रवाही वक्त्याही होत्या. दादींची वाणी शक्तिशाली होती. वक्तृत्वकलेच्या धनी दादी, अनेकांना परमात्म ज्ञानाचा आरसा दाखवीत आणि सत्यतेच्या अधिकाराने रमणीकतेने विषयाची अशी सुरेख मांडणी करीत की, त्यामुळे शास्त्रांमधील रहस्ययुक्त गोष्टीही सामान्य बुध्दी असलेल्या व्यक्तीलासुध्दा सहज समजत. कधी कधी त्या हसतहसत म्हणत, 'जर रावणाला दहा तोंडं होती तर दशानन कसा झोपत असेल, त्याची दहा तोंडे फोल्डींग तोंडे होती का? कोणत्या तोंडाने खात असेल? कोणत्या तोंडाने बोलत असेल? जेव्हा असं खुसखुशीत बोलत, तेव्हा हॉलमध्ये खसखस पिकत असे.'

अखेर अनेक पतित पददलित पीडित जनांचा उद्धार करत, असंख्य नर नारींचे उत्थान करत करत - ही स्नेहसरिता स्वतः स्नेह सागरात विलीन व्हायला निघाली. ८ आक्टोबर २००४ रोजी देह त्याग करुन चैतन्य पतित पावनी ज्ञान गंगा ज्ञान सागर शिवपित्याच्या कुशीत सामावून गेल्या. अशा यज्ञाच्या पूर्वज रत्नांपैकी दादी आत्मइंद्राजींना पुण्यतिथीनिमित्त, पुण्यस्मरण करुन श्रध्दा सुमन अर्पित करूया, गंगे दादींना आमुचे शत् शत् नमन!

***

सुविचार

जेव्हा एका शब्दांत काम होणे शक्य असते,
तेव्हा दोन शब्दांचा वापर न करणे महत्त्वाचे.

- थॉमस जेफरसन

दादी जानकीजींचा क्लास
शांतीवन

निर्संकल्प होऊन योजलेलं कार्य प्रत्यक्षात आणावं, उत्साहाने प्रत्येक कार्य करावं

शिवबाबा सर्वशक्तिमान, पतित-पावन, ज्ञानाचा सागर आहे. आपण बुद्धीने जितके बाबांच्या जवळ असू तितके त्यांच्या स्नेहामुळे संपन्न बनणं सहज वाटतं. त्यासाठी एकतर शांत राहणं आवश्यक आहे. शांत राहिल्याने बाबांची शक्ती आपोआपच सर्व कार्य करवून घेते. बाबांचं एक एक महावाक्य आम्ही अनुभवलं आहे. आपल्यासारखंच इतरांनाही तो कसं पावन करतो, ते प्रत्यक्ष पाहिलं आहे. बाबा काय म्हणतात ते एकदा जरी ऐकलं तरी आत्म्याचा बुद्धीरूपी तिसरा नेत्र उघडून आयुष्यच बदलून गेलेलं दिसेल. आपण त्रिलोकाचे स्वामी असलो, तरी इथे निमित्तमात्र आहोत. बाबांच्या सांगण्याप्रमाणे अर्थात् श्रीमतावरच चालतो.

आपल्याकडून सगळं करवून घेणारा करविता (करावनहार) परमात्मा शिवबाबा आहे. तरीही बाबा म्हणतात मी काहीच करत नाही. सर्व मनुष्यात्म्यांसारखा मीदेखील चांगल्या वाईट कर्मांच्या बंधनात अडकलो, तर जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकेन. 'मी अकर्ता आहे'. म्हणूनच ब्रह्माबाबांकडून करवून घेतो. ब्रह्माबाबांना विचारलं तर ते म्हणतात, 'शिवबाबा करतात.' बापदादांचा आपसांत किती मधुर संबंध आहे. आपल्याला पारलौकिक आणि अलौकिक दोन्ही पित्यांकडून प्राप्ती होते. काही भोळे ब्रह्मावत्स फक्त ब्रह्माबाबांची आठवण ठेवतात. बुद्धी परमधामापर्यंत पोहोचत नाही त्यामुळे शिवबाबांची स्मृती ठेवण्यासाठी त्यांना मेहनत करावी लागते. काहीजण (साकार माध्यम) ब्रह्माबाबांना सोडून फक्त निराकार शिवबाबांची आठवण करतात. त्यांच्या बुद्धीत ज्ञान खऱ्या अर्थाने अजून सामावलंच नाही असं म्हणावं लागेल.

'मी एक चैतन्य आत्मा आहे, परमात्मा माझा पिता आहे, सृष्टिनाटकातील प्रत्येक दृश्य निराळं; पण आवडीचं आहे' ही समज आपल्या संगमयुगी ब्राह्मण जीवनाचा आधार आहे. मग प्रत्येक दिवस, त्यातील एक एक क्षण सार्थकी लागतो. व्यर्थ विचारांत वेळ वाया जात नाही. सशक्त मन आणि विशाल हृदय असेल तर समजावं खरेपणा आहे. यामुळे साहेब अर्थात् सर्वशक्तिवान परमात्मा माझ्यावर प्रसन्न होऊन त्याची शक्ती मदत करते. त्या आधारे जे कर्म होतं, तो आत्म्यांचा आपापला पार्ट आहे. मुळात जर इतरांच्या कार्यात कमतरता पाहून सुधारणा सुचवणं (करेक्शन), कुणाशी स्पर्धा वा तुलना करणं, असं काही नसेल तर बुद्धी फ्री राहते. स्वत:चा चार्ट पाहायला हवा. बाबा ज्याप्रमाणे एक एक वत्साचा पार्ट बघून खूष होतात, आपणही त्यांचं अनुकरण केलं पाहिजे. मुलांना सदैव आनंदी ठेवण्यासाठी ते योजना आखतात. पिता परमात्मा किती निरहंकारी आहे, स्वत: कार्य करूनही ड्रामामध्ये नोंदलेलं आहे असंच सांगतो. त्याची योजना आपण फक्त बुद्धी स्थिर ठेऊन कार्यान्वित करायची.

एखाद्या नटाने जर समरस होऊन अभिनय केला नाही तर दिग्दर्शक काय म्हणेल? परमात्मा या सृष्टी नाटकाचा रचनाकार, दिग्दर्शक आणि प्रमुख अभिनेता आहे. कवडीमोल बनलेल्या आत्म्यांना पैलू पाडून मौल्यवान हिरा बनवतो. पुरूषार्थ करताना कधीही गोंधळून जाऊ नका. रोज अमृतवेळेला

सूक्ष्म (अव्यक्त) वतनातून अव्यक्त बाबा दृष्टी देतात. आपल्याला या साकार शरीराच्या भानातून बाहेर काढून अव्यक्त फरिश्ता बनवतात. विचार करा, मी अशी अव्यक्त दृष्टी घेतो का? दिवसभरात जे घडलं त्या सगळ्याला बिंदू लावून संध्याकाळी (नुमाशाम) पुन्हा योगाला बसायचं. मग रात्र येते ती स्वत:च्या सुंदर भाग्याची स्मृती घेऊन. रोज स्वत:चं भाग्य बनवताना आपण इतरांचही भाग्य उजळावं. जो भेटेल त्याच्याकडे पाहून छानसं स्मित करावं म्हणजे सगळं सोपं होऊन जाईल.

आपण स्व-स्थितीत स्थिर झाल्यावर का, कसं अशा प्रश्नांच्या व्यर्थ कोलाहलापासून मुक्त होतो. या स्व (आत्मिक) स्थितीमध्ये राहणं हीच रॉयल्टी आहे. बाबा मीराबाईचं उदाहरण देतात. ती श्रीकृष्णाची भक्त होती. आपण तर ज्ञानी आत्मा आहोत. 'शिवबाबा आम्ही सदैव तुझ्याबरोबरच राहू, भोजन करू..' प्रत्यक्ष जीवनात हा अनुभव घेतलाय. कित्येकदा साकार बाबांनी आपल्यासोबत भोजन करवलं, दादी - दिदींनीही प्रेमाने खाऊ घातलं. मी भाग्यवान आहे. संगमयुगातला हा वेळ खूप छान आहे. बाबांनी आपल्याला जे दिलयं त्याची स्मृती ठेवणं म्हणजे स्व-स्थितीत राहणं. आता विज्ञानाची अनेक साधनं, दूर असून जवळीकतेचा अनुभव करवतात. परंतु अनेकांना खुशबाज स्वभावच आवडतो, संघटना तयार करणं, त्यात राहणं, जवळीकतेतून जो स्नेह निर्माण होतो त्याचं फार महत्त्व आहे. फक्त सचोटी हवी. मी पाहत आहे. आजकाल बाबांची एक एक शिकवणूकच आपलं रक्षण करत आहे. या पुरूषोत्तम संगमयुगात गोप गोपिकांसारखे आत्मिक प्रेमाने राहणारे आपण सगळे ब्रह्मावत्स देवदूत (फरिश्ता) आहोत. किती उच्च आणि सुंदर उपाधी आहे.

भावानुवाद – ब्र. कु. अर्चना, ठाणे (प.)

***

(पान क्र. ७ वरून)

योगमग्न जानकी दादीजी. त्या अत्यंत पवित्र वातावरणात, एका अनामिक ओढीने कधी त्यांच्या समोर जाऊन बसलो ते डिनीसबेनना कळलंच नाही. दादी दृष्टी देत होत्या. त्यांच्या मस्तकातून फुटबॉल एवढा दिव्य प्रकाशाचा गोळा जणू उडत होता. थोडया वेळाने असाच एक तेजाचा गोळा दादींच्या भृकुटीतून निघून आपल्यात सामावल्याची अनुभूती डिनीसबेनना झाली. परमात्म शक्तीने त्यांचा दिव्य अलौकिक ब्राह्मण जन्म झाला. सात दिवसांचा कोर्स पूर्ण होण्याआधीच त्यांनी सगळ्या ईश्वरी नियम - मर्यादांचं पालन करण्यास सुरवात केली. ब्रह्माकुमारी म्हणून नवीन आयुष्य सुरू करताना सफेद साडी परिधान करणं तर मुळीच अवघड वाटलं नाही. त्यांच्या स्वप्नात वर्षभर जो अगम्य भाषेतला कागद येई तोच आता मुरलीच्या रूपाने साकार झाला. ईश्वरी महावाक्य मुळातून वाचता यावी म्हणून त्या हिंदी भाषा शिकल्या. मग त्याचा इंग्रजी अनुवाद करण्याची सेवाही आरंभ झाली.

१९७४ मध्ये सहा महिन्यांच्या आतच भारतात येऊन बापदादांना भेटण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्या पहिल्या भेटीतच बाबांनी त्यांना अलौकिक नाव दिलं 'विजयंती'. प्रत्यक्ष परमात्म्याकडून विजयाचं वरदान मिळालेल्या डिनीसबेननी जर्मनी, कॅनडा तसंच अमेरिकेसारख्या देशांत ईश्वरी सेवा रुजवली, फुलवली. चला आपणही अशा विशेष आत्म्यांकडून प्रेरणा घेऊन निश्चयबुद्धी विजयंती होऊया.

(संदर्भ पुस्तक : प्रभूप्रेम के परवाने)

***

विजयादशमी – एक आध्यात्मिक विचारमंथन

ब्र.कु. भक्ती, पुणे

अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमीपर्यंत नवरात्री उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करून येणारा दहावा दिवस म्हणजे दसरा. विजयादशमी. दसऱ्याचे आध्यात्मिक रहस्य तर आपण सगळे जाणतोच. श्रीरामाने रावणावर विजय मिळवला तो दिवस. देवीने महिषासुराशी युद्ध करून त्याला मारला तो दिवस. पांडवही अज्ञातवास संपवून परत निघाले तो हाच दिवस म्हणूनच म्हणतात ''दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा.'' हा साडेतीन मुहूर्तातला एक मुहूर्त म्हणूनही ओळखला जातो. असं म्हणतात की मराठे वीर किंवा रजपुतांनी युद्ध मोहिमांना याच दिवशी प्रारंभ केला. पराक्रमाचा, विजयश्री मिळविण्याचा आनंद लुटण्याचा व परस्परातील प्रेम वृद्धिंगत करण्याचा असा हा सुंदर सण. अज्ञानावर ज्ञानाने, शत्रूवर पराक्रमाने, वैऱ्यावर प्रेमाने विजय मिळवायचा अशी ही विजयादशमी.

मग इतके अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या ह्या दिवसाची आपण फक्त आठवणच जपायची की त्याचा बुद्धीच्या निकषावर सहज सुंदर अर्थही पाहायचा. ही खरंतर विचार करायला लावणारी गोष्ट आहे. आजच्या कलियुगात प्रत्येकाच्या मनांत राम-रावणाचे, सुष्ट-दृष्ट विचारांचे युद्ध सुरूच असते. यात कधी रामाचा तर कधी रावणाचा विजय होतो. या युद्धात सतत रामाचा म्हणजे श्रेष्ठ, सकारात्मक विचारांचा विजय व्हावा ही प्रत्येकाचीच मनस्वी इच्छा असते मग असे असूनही कधी कधी रावण वरचढ का ठरत असावा?

रावण हा रामायण काळातील लंकेचा राजा ही सर्वसामान्य ओळख आपल्या सर्वांनाच आहे. दहा तोंडे असलेला म्हणून त्याला 'दशानन' असेही म्हणतात. 'पण खरंच एखाद्याला १० तोंडे आणि २० हात असतील का हो?' रावणाबद्दल कितीतरी सकारात्मक गोष्टीही पुराणात उपलब्ध आहेत. तो महान तपस्वी होता, शिवाचा निस्सीम भक्त होता. विद्वान होता. त्याला चार वेद व सहा उपनिषदांचे सखोल व संपूर्ण ज्ञान होते. १० पंडितांची विद्वत्ता एकाच व्यक्तिमत्त्वात होती म्हणून १० तोंडाचा दशानन असाही सांकेतिक अर्थ अनेक जण सांगतात.

परंतु एवढे महान, उत्तुंग व्यक्तिमत्त्व असूनही एकच अनीती, दुष्टकृत्य (कुकर्म) त्याच्या हातून घडले ते म्हणजे सीतेचे अपहरण आणि म्हणतात ना, कितीही भव्यदिव्य व्यक्तिमत्त्व असले तरी एक महान चूक व्यक्तीला सर्वनाशाकडे, अपकिर्तीकडे घेऊन जाते. वास्तविकपणे पाहता दहा तोंडे म्हणजे ५ मोठे विकार व ५ त्यांची वंशावळ किंवा ५ विकार पुरुषाचे व ५ विकार स्त्रीचे. आत्मा पुरुष व प्रकृती दोघेही पतित झाले.

हे सर्व कथानक फार खोलवर विचार करायला भाग पाडते. थोडीशी चूक, अविचारी निर्णय हा जीवनामध्ये विनाशाला कारणीभूत ठरतो. नाव कमवायला वेळ लागतो; पण गमवायला एक चूक पुरेशी असते. अशी दुष्टबुद्धी, वृत्ती, कृती कोणाचीच न होवो. या दुष्ट प्रवृत्तींना जाळून टाकणे म्हणजे खऱ्या अर्थाने रावणाचे दहन. ही मनातील दुष्टवृत्ती जळून गेल्यावर उरते ती फक्त श्रेष्ठ, शुभ, सात्त्विक वृत्ती. यातून दुसऱ्यांना सर्वतोपरी सुखच मिळते.

(पान क्र. २५ वर)

शुभ दीपावली

ब्र. कु. लक्ष्मी, बोपोडी, पुणे

भारत देशात दिवाळी हा सण लहानापासून मोठ्यापर्यंत, गरीबापासून श्रीमंतांपर्यंत प्रत्येकजणच मोठ्या जल्लोशात साजरा करतात. दरवर्षी आपण हा सण पारंपरिक, धार्मिक रितीने विधिवत करत आलो आहोतच. पण ह्या उत्सवांमध्ये कोणते आध्यात्मिक रहस्य दडलेलं आहे हे जाणलं तर दुधात साखरच! म्हणजेच आपल्या उत्साहात भर पडेल किंवा सणाच्या दिवसापुरते मर्यादित न राहता आपला उत्साह कायमच राहील.

दिवाळी हा सण सुरू होतो घराच्या साफ सफाईने. यावेळी घराचा कानाकोपरा साफ केला जातो. सर्वत्र दिव्याच्या रोषणाईची आरास केली जाते. कारण अशी मान्यता आहे की जिथे स्वच्छता आणि प्रकाश, दिव्यता आहे तिथेच श्रीलक्ष्मी धनदेवीचे आगमन होते आणि श्री लक्ष्मी धनधान्य संपन्न करते. या दिवशी घराचे दरवाजे बंद केले जात नाहीत. परंतु ज्याप्रमाणे घराच्या सफाईचं महत्त्व आहे तेवढेच आपल्या अंतरात्माच्या मनाच्या कानाकोपऱ्याच्या सफाईकडे लक्ष देणं आवश्यक आहे. मनुष्य आत्म्यांचं मन विकार वासनांनी मलिन झालं आहे. त्यात ईर्षा, द्वेष, घृणा याची जळमटं पसरली आहेत. दुसऱ्यांच्या अवगुणांना आपल्या मन मंदिरात स्थान देऊन त्याला दूषित केलेलं आहे. यासाठी अंतर्मनाला ईश्वरी ध्यान धारणेने शुद्ध स्वच्छ करणं अत्यंत आवश्यक आहे.

दीपावलीचे मुख्य आकर्षण म्हणजे दिव्यांचा झगमगाट. त्याची आरास नयनरम्य असते. पण तो तेवत ठेवण्यासाठी तेलाची आवश्यकता असते. तेल संपलं की दिवा विझतो. त्याचप्रमाणे आपलं हे शरीर देखील मातीची पणतीच आहे आणि त्यामधील ज्योत म्हणजे आत्मा. त्या अंतरात्म्याची नेहमी स्मृती राहणं म्हणजे जणू तेलंच. स्थूल दिव्याने जगात उजेड दिसतो. पण आत्मज्योतीच्या जागृतीने जीवनात सुख-शांती संपन्नतेचा उजेड होतो. आत्मस्मृतीचे तेलच नसेल तर आत्मज्योती विझते म्हणजे आपण दिव्यांनी घर सजवलं तरी आत्मिक सुख-शांती प्रसन्नतेने वंचितच राहतो. जगात उजेड; पण जीवनात अंधार म्हणूनच या देहाला चालवणारी मी चैतन्य ज्योती, आत्मा आहे या स्मृतीने आत्मदिवा सतत तेवत ठेवला पाहिजे.

लक्ष्मी पूजनाला आपण लक्ष्मी अर्थात् धन संपत्तीची पूजा करतो. परंतु आज करोडपती लखपतीचे मन सुखी-शांत आहे का? खरं पाहता लक्ष्मी ही धन संपत्ती किंवा कागदी नोटांची नव्हे तर आत्मिक सुख-शांतीची स्वामिनी आहे. गुणशक्तीची निर्माती आहे. तिचे स्थान मातीच्या घरात नाही तर आपल्या आत्म्याच्या मन मंदिरात आहे. घराचे दार उघडे ठेवतो; पण आपल्या मनाचे दार उघडे असणे आवश्यक आहे.

दिवाळीत व्यापारी मंडळी आपले जुने खाते वह्या बंद करून नव्याने प्रारंभ करतात. प्रत्येक व्यक्तीही एक प्रकारे व्यापारी आहे. जीवनाच्या वहीत सुख-दुःखाच्या बेरीज, वजाबाक्या करत असतो. वैर भावना, सूडाच्या भावनांच्या कर्ज-व्याजाच्या चक्रात अडकतो. पण आपण कनिष्ठ कर्माचं खातं रिकामे करून, श्रेष्ठ कर्मांचा गुणाकार करून घेवून जाणार आहेत हे उद्दिष्ट असले पाहिजे. त्यासाठी या शुभ मुहुर्तावर नवीन विचारधारेची श्रेष्ठ पुण्यकर्मांची नवीन

(पान क्र. २८ वर)

अंत मति सो गति

दादी हृदयमोहिनी यांचे अमृतवचन

'शेवटचा दीस गोड व्हावा' याचसाठी केला होता अट्टाहास या उक्तीप्रमाणे आपल्या आयुष्यात हा योग यावा याकरिता दादी हृदयमोहिनींचे अमृतवचन.

१) दीर्घ कालावधीसाठी केलेला 'पुरुषार्थ' हाच 'अंत मति सो गति' चांगली होण्याचा उपाय किंवा २) 'अंत मति सो गति' चांगली होण्यासाठी, दीर्घ कालावधीसाठी केलेला 'पुरुषार्थ' अति आवश्यक आहे. ह्या वरदान भूमीचा कानाकोपरा (प्रत्येक जागा) वरदानी संकल्पानी व्यापून राहिलेला आहे. त्यामुळेच मधुबनमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला, अनेक प्रकारच्या प्राप्तींची अनुभूती होते. इथे आल्यावर ह्या विशाल ब्राह्मण कुटुंबाशी ओळख होते. ह्यातील प्रत्येक सदस्याकडून मिळणाऱ्या शुभ भावनांमुळे स्वस्थिती शक्तिशाली झाल्याचा अनुभव येतो. म्हणूनच ह्या वरदानी भूमीचे नाव आहे 'मधुबन'. तर अशा या ठिकाणी जिथे सतत वरदानी स्पंदने भरून राहिली आहेत. तेथे पावलो पावली वरदानी प्राप्तीचा अनुभव येत राहतो. तर ह्याचा फायदा किती आणि कसा करून घ्यायचा हे प्रत्येकाने स्वतःच ठरवावे.

इथे प्रत्येकाने 'बेफिक्र बादशाह' (निर्धास्त नृप) ह्या स्थितीचा अनुभव अवश्य केला पाहिजे. इथून जाताना जेवढी समृद्धीची अनुभूती घेऊन जाता, त्या स्थितीचा अनुभव तिकडे जाऊन अनेकांना करवा ही खरी सेवा असेल. इथे येऊन प्रत्यक्ष ईश्वरी वरदानाचा स्वीकार न करणे म्हणजे आपले परमभाग्य नाकारणे असेच म्हणावे लागेल. स्वतःला परमात्म संतान निश्चय करून परमपिता परमात्म्याला आपला पिता म्हणून स्वीकार केल्यावर जे स्वतःला घडवायचे आहे, जे स्वपरिवर्तन करावयाचे आहे ते आता नाही तर मग केव्हा करणार?

म्हणून आता स्वचिंतन करा की, बाबांना मला काय बनवायचे आहे? बाबांच्या माझ्याकडून काय अपेक्षा आहेत? त्यानुसार माझे वर्तन का होत नाही? भगवंत जेव्हा भाग्य वाटत होता तेव्हा तू कुठे होतास? हे म्हणणे माझ्या बाबतीत आता लागू होत नाही ना? जेव्हा संकटे येतात तेव्हा माझ्याच बाबतीत हे का? कसे? हे प्रश्न बाजूला ठेवून त्या संकटांवर मात करावयास शिका. मी, माझे सोडून द्या कारण ह्या मीपणाचे 'ओझे'च आपल्याला अशक्त करते, शक्तिहीन करते. मग अशा वेळी 'बाबा बाबा' मदत करा असा धावा सुरू होतो! बाबा जे सांगत आहेत त्याप्रमाणे न वागता आपल्या मनाप्रमाणे वागलात तर हेच होणार ना? जर कुठल्याही बाबतीत संशय न घेता बाबांच्या सांगण्याप्रमाणे वर्तन नसेल तर शक्तिहीन अवस्थेचा अनुभव होत राहील. यश आपल्याला प्रत्येक बाबतीत हुलकावणी देत राहील. म्हणून 'अंत मति सो गति' चांगली होण्याचा एकच उपाय आहे दीर्घ कालावधीकरिता श्रीमतानुसार एकलव्यासारखा केलेला पुरुषार्थ. तुम्हाला माहिती आहेच की सध्याचा काळ हा अकस्मात मृत्युंचा आहे. कधीही काहीही होऊ शकते. तेव्हा आपल्यातील दोष निपटून काढून आपल्यातील जे गुण आहेत ते जाणून घ्या आणि त्यांच्या वृद्धीसाठी सतत झटत रहा. लक्षात घ्या, प्रत्यक्ष ईश्वराने तुम्हाला ओळखले आहे, पारखले आहे

(पान क्र. २८ वर)

सदैव खुश रहा व सर्वांना आनंद वाटा

ब्र. कु. शिवाजी, कल्याण

प्रत्येक माणसाला जीवनात प्रामुख्याने ३ गोष्टी हव्या असतात. १) स्वास्थ्य (Health), २) संपत्ती (Wealth), ३) आनंद (Happiness).

वास्तविक या तिन्ही गोष्टी प्राप्त करण्यासाठी केवळ १ शब्द लक्षात ठेवा, तो म्हणजे आनंद – कारण गायन केले जाते – 'खुशी जैसी खुराक नहीं' तसेच दुसरे गायन केले जाते – 'खुशी जैसा खजाना नहीं'. तात्पर्य म्हणजे आनंदाचा खुराक खाल्ल्याने स्वास्थ्य चांगले रहाते. तसेच आनंद असेल तर आपल्याजवळ असलेले थोडे फार धनसुद्धा खजिना असावा असे वाटते. कारण आहे त्या धनात आपल्याला समाधान वा संतुष्टता मिळते. त्याचबरोबर प्राप्त धन जर आनंदाने ईश कार्यात लावल्यास ते कित्येक पटीने वाढते. त्यामुळे जीवनात सदैव आनंदी राहणे हेच एकमेव उद्दीष्ट असले पाहिजे. परंतु जगात माणसे मात्र नेमकं उलट करतात. ते पैसा कमविण्याच्या मागे लागतात. त्यासाठी रात्रं-दिवस मेहनत करतात व त्यानंतर भविष्यात आपल्या जीवनात आनंद मिळेल, असा विचार करतात.

विद्यार्थीदशेत प्रत्येकाला वाटते, आपण मोठं होऊन खूप चांगली नोकरी मिळवू. खूप पैसा कमवू. मग पुढे चांगली बायको असेल, मोठ्या थाटामाटात लग्न करू. आपण खूप मौज-मजा करू. पुढे वाटते मुलं-बाळं झाली की त्यांना आपल्यापेक्षाही मोठं करू. त्यांचा घर-संसार उभा करू. अशा रीतीने जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मनुष्य आपण पुढे काय करायचं व त्यापासून पुढे कसा आनंद मिळवायचा, याची स्वप्ने रंगवत असतो. अशा रीतीने जेव्हा तो जीवनाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचतो तेव्हा त्याला वाटायला लागते की आपण जीवनात काहीच केलं नाही. बरीच स्वप्ने रंगवली होती. परंतु त्यातली बरीचशी स्वप्नं धुळीला मिळाली. वाटलं होतं की म्हातारपणी आपली मुलं आपला सांभाळ करतील. आपण खूप आनंदात राहू. परंतु आता शरीर साथ देत नाही आणि मुलंही आपल्याकडे लक्ष देत नाहीत. ती आपल्या संसारात रमली आहेत. मग जीवनात निराशा अनुभवाला येते. मनुष्य नाउमेद होतो. जीवन जगण्याची इच्छा गमवून बसतो. परिणामतः त्याची इम्युन सिस्टीम (प्रतिकार शक्ती) कमी होत जाते व शेवटी कुठल्या तरी आजाराला बळी पडून त्याला मृत्यू येतो.

या जगात ९५% लोक अशाप्रकारचे जीवन जगतात. कारण त्यांना जीवन जगण्याची कला आत्मसात झालेली नसते. ती कला फक्त ५% लोकांनाच साध्य होते व तेच फक्त खऱ्या अर्थी आनंददायी जीवन जगतात. त्यांच्या जीवनाचा मूलमंत्र हाच असतो की सदैव आनंदी रहा व सर्वांना आनंद वाटत रहा. जितकी आपण खुशी वाटत राहू तेवढी ती वाढत जाईल. त्यामुळे दिवसभरात केवळ हीच गोष्ट तपासून बघा की २४ तासातील किती तास सदैव आनंदात राहून दुसऱ्यांना आनंद प्रदान केला.

वरती आपण पाहिलं की ५% लोकांना जीवन जगण्याची कला ज्ञात असते. असे कोण? तर जे ईश्वरी ज्ञान घेतल्यानंतर ज्ञानमार्गात चालतात. परंतु त्यांना सुद्धा ही कला लगेचच आत्मसात होत नाही. त्यांच्याही जीवनात वेळोवेळी परीक्षा-समस्या-अडचणी येतात. त्यांच्या बाबतीत नेमकं होतं काय? त्यांच्या जीवनातील आनंद अगदी छोट्या दरवाजाने बाहेर निघून जातो. तो दरवाजा आहे – तो मला

असे म्हणाला, 'माझी काही चूक नसतांना माझा अपमान केला, माझ्या स्वाभिमानाला ठेच पोहोचली, मला काहीच किंमत दिली नाही. मी एवढं कार्य करून देखील माझी हीच किंमत, मला माझी किंमत दाखवावी लागेल, मी त्यांना अगदी सरळ केल्याशिवाय रहाणार नाही. अशाप्रकारे अनेक जिद्द व सिद्ध करण्याचे संकल्प सातत्याने मनात येत रहातात. यातून 'फीलिंगच्या फ्लू' ची बाधा होते. याचा परिणाम काय होतो? सगळ्या गोष्टी अर्थहीन, बेचव वाटू लागतात.

जसे 'फ्लू' तापामध्ये तोंडाची चव जाते. कुठलीही गोष्ट बेचव वाटते. तसेच तापामुळे शरीर दुर्बल वाटते. अशीच 'फीलिंगचा फ्लू' झाल्यानंतर साधकाची स्थिती होते. त्याला साधनेत रस वाटत नाही, सेवेत रस वाटत नाही. परिणामतः दिवसेंदिवस आत्मा देखील दुर्बल बनत जातो व पुरुषार्थातील त्याचा उत्साह कमीच होत जातो. ही सगळी लक्षणे 'फीलिंगचा फ्लू' झाल्यानंतर दिसून येतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आनंद गायब होतो. ब्रह्मावत्साच्या जीवनात अशा प्रकारचे बरेच प्रसंग येतात कारण ब्रह्माकुमारी संघटन हे अनेक प्रकारच्या स्वभाव-संस्कार असणाऱ्या व्यक्तींनी बनले आहे. त्यात स्वभाव-संस्कारांची टक्कर ही होणारच. मग अशा परिस्थितीत काय करावे?

या अनुषंगाने आपण एक प्रसंग पाहूया - एकदा एक कन्या मम्मांच्याकडे एका सखीची तक्रार करायला आली व म्हणाली, ''मला त्या सखीचा खूप राग आला आहे. कारण ती माझ्याविषयी खूप खोटं-नाटं बोलली.'' त्यावेळी मम्मांनी तिला समजावून सांगितले की तिने असे करायला नको होतं. ते तिचं चुकलं. परंतु तिचं खोटं-नाटं बोलणं मनावर घेऊन तू मनातून तिच्यावर रागावणे हे तरी योग्य आहे का? त्यामुळे तुझी स्थिती खराब झाली. तू आपल्या मनाला दुःखी करून घेतलस. बाबांनी आपल्याला हीच शिकवण दिली आहे की 'न दुःख लो, न दुःख दो'. कुणी आपल्याला अगदी फुकट, न मागता दुःख दिलं तर ते आपण घेणार का? कोणी आपल्या घरात कचरा आणून टाकत असेल तर आपण काय करु? लगेचच दार बंद करून टाकू ना! तसेच दुसऱ्याने दुःख दिलं तर आपल्या मनाचा दरवाजा सर्व प्रथम बंद करून घ्या. म्हणजे कालांतराने दुसऱ्याला दुःख देण्याचा विचार येणार नाही. दुसऱ्याने दिलेलं दुःख मनांत साठून राहिल्याने 'फीलिंगचा फ्लू' होतो व त्यातूनच संबंधात कटुता निर्माण होते.

म्हणूनच 'ब्राह्मणापासून फरिश्ता' बनण्यासाठी 'दया व क्षमा' हे दोन पंख आवश्यक आहेत. जो ब्राह्मण सदैव हे दोन पंख लावतो तोच फरिश्ता बनून सदैव उडू शकतो. जसे उमंग-उत्साह, ज्ञान-योग हे पंख आहेत तसेच 'दया-क्षमा'- हे देखील आहेत.

अशाप्रकारे 'दया व क्षमा' हे दोन पंख धारण करून फरिश्ता (देवदूत) बनणे सहज आहे. परंतु मुख्य अडथळा असतो तो देहअभिमान निर्मित अभिमान व अपमानाची भावना. यावर सहज विजय प्राप्त करण्यासाठी शिवबाबांनी आपल्याला स्वमान दिला आहे - 'पूर्वज व पूज्य आत्मा समजा'. आत्ममूल्य वाढवण्यासाठी संकल्प दिला.

कोणत्याही आत्म्याची दया येणे तसेच त्याला क्षमा करण्याचा आधार हा स्वमान आहे. आई-वडील जसे आपल्या मुलाला सहजपणे क्षमा करतात. मुलाविषयी त्यांच्या मनात सदैव दयेची भावना असते. त्याच्या कल्याणाची भावना असते तसे स्वतःला पूर्वज व पूज्य आत्मा समजल्याने आपण कोणत्याही आत्म्यावर दया करू शकतो. तसेच त्याला क्षमा देखील करू शकतो. म्हणूनच शिवबाबा हेही सांगतात की स्वतःला 'जगन्माता व जगत पिता' समजा.

हा स्वमान असेल तर आपल्याला आपले कर्तव्यसुद्धा आपोआपच आठवेल की आपल्याला साऱ्या विश्वरुपी कुटुंबाला खुशी प्रदान करायची आहे. मग ती आपल्या दृष्टीद्वारे, वृत्तीद्वारे, बोलाद्वारे व कर्माद्वारे कुठल्या ना कुठल्या प्रकारे अवश्य द्यायची आहे. जसा कुटुंब प्रमुख आपल्या घरातील प्रत्येक सदस्याला खुश ठेवण्याचा प्रयत्न करतो. तसेच आपल्याला देखील करायचे आहे. अहोरात्र विश्वरुपी कुटुंबाच्या कल्याणाचे विचार आले पाहिजेत.

***

परम आनंददायिनी पवित्रता

भाग – २

ब्र. कु. सूरजभाई, आबू पर्वत

आपली पवित्रतेची स्थिती परिपक्व बनविण्यासाठी प्रतिदिन १० मिनिट एकांतात बसून, पवित्रतेच्या महानतेविषयी चिंतन केले पाहिजे. याद्वारे आपली स्थिती शक्तिशाली बनत जाईल. आपल्या जीवनात पवित्रतेची वृद्धी होत जाईल. परिणामतः अश्लील सिनेमा पाहणे, टी.व्ही.वरच्या नको त्या सिरियल पाहणे, मोबाइलवर व्यर्थ वेळ घालवणे, घाणेरडे साहित्य वाचणे, कामुक गीते ऐकणे ... या सर्व गोष्टी मनाला आवडेनाशा होतील. पवित्रतेची शक्ती वाढविण्यासाठी रोज अर्धा तास हा अभ्यास करा, ''मी पवित्रतेचा फरिश्ता (देवदूत) आहे, कमल आसनावर विराजमान आहे. परमधाम निवासी परमात्मा शिव पित्याकडून माझ्यावर पवित्रतेची किरणे पडत आहेत. ती मज आत्म्यामध्ये सामावली जात आहेत. या पवित्र किरणांनी माझी कर्मेंद्रिये शीतल बनत आहेत.''

त्यानंतर किमान १० मिनिटे असा अभ्यास करा, ''मी मास्टर पवित्रतेचा सूर्य आहे. मी पवित्रतेचा देव/देवी विश्वाच्या ग्लोबवर विराजमान आहे. परमात्मा पित्यापासून निघालेली किरणे माझ्यामध्ये प्रवेश करून, चोहीकडे पसरत आहेत. फलस्वरुप विश्वातील सर्व आत्मे तसेच प्रकृती पावन बनत आहे.'' अशाप्रकारे निरंतर पवित्रतेची साधना केल्याने आपण सर्वोच्च स्थिती प्राप्त करु शकतो.

आनंददायिनी पवित्रता

या विश्वात दोनच मोठ्या शक्ती आहेत.
१) पवित्रतेची शक्ती २) योगाची शक्ती. ज्यांच्याकडे या दोन शक्ती आहेत त्यांची हार कधीच होऊ शकत नाही. या दोन्ही शक्ती एक दुसऱ्याच्या पूरक आहेत. जितकी आपली पवित्रतेची शक्ती सूक्ष्म होत जाईल तितका आपला योग निरंतर होत जाईल. तसेच योगात एकाग्रता होत गेल्याने पवित्रतेची शक्ती फार मोठ्या प्रमाणात अनुभवाला येईल. असा पवित्र आत्मा स्वराज्य अधिकारी (अर्थात आपल्या मन-बुद्धी-संस्कारांचा मालक) तसेच प्रकृतीचा मालक असण्याचा अनुभव करेल. असा पूज्य आत्मा ज्याठिकाणी उपस्थित असेल तेथील सर्वांची सुरक्षा व सेवा यासाठी तो निमित्त बनेल.

पवित्रतेची शक्ती श्रेष्ठ असल्याने मन आपोआपच आनंदी राहू लागते. या सूक्ष्म आनंदालाच अतींद्रिय सुख असेही म्हटले जाते. या सुखाची गोडी चाखता-चाखता आत्मा या दैहिक दुनियेच्या व देहाच्या आकर्षणापासून अलिप्त होत जातो. त्यामुळे आता संगमयुगात प्रत्येकाने पवित्रतेचे व्रत दृढतापूर्वक धारण केले पाहिजे. त्याचबरोबर हे देखील लक्षात ठेवा – योग साधनेशिवाय पवित्रतेची स्थिती नॅचरल (स्वाभाविक) बनणार नाही. म्हणूनच ज्ञानमार्गातील मुख्य पुरुषार्थ आहे – ''योगी बना, पवित्र बना।''

एकदा पवित्रतेच्या मार्गावर चालायला लागल्यानंतर या पतित संसाराकडे मागे वळून सुद्धा पाहू नका. दृढतापूर्वक चालत रहा म्हणजे आपले ध्येय नक्कीच गाठता येईल. कारण पावलोपावली आपल्याला परमात्मा शिव पित्याची मदत प्राप्त होत असते.

पवित्रता सर्व गुणांची जननी

पवित्रता केवळ सुख-शांतीची जननी नसून, ती सर्व गुणांची जननी आहे. पवित्रतेची धारणा केल्यानंतर अन्य सर्व गुण आपोआपच धारण होतात. आपल्या शुभ भावना व शुभकामना आपल्यातील पवित्रता प्रत्यक्ष करु लागतात. आंतरिक प्रसन्नता चेहऱ्याद्वारे चमकू लागते. आपल्यातील

गहन शांती सर्वांना सांत्वना देऊ लागते. आपली संतुष्टता अनेकांना पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करते. आपण सदा स्वमानात स्थित राहून सर्वांना मान देऊ लागतो. आपली सुखदायी वृत्ती दुसऱ्यांवर सुखाचा वर्षाव करु लागते. आपली अंतर्मुखता दुसऱ्यांना आपली महानता दर्शवते. पवित्र आत्म्याचा एक-एक संकल्प अनेक आत्म्यांसाठी वरदान बनतो. जे संपूर्ण पवित्र बनतात तेच वैजयंती माळेचे मणी बनतात. तात्पर्य म्हणजे पवित्रतेचे महत्त्व लक्षात घेऊन, तिची धारणा करणे, हेच पूर्ण हितकारी आहे.

पवित्रता – ईश्वरी सेवेचे श्रेष्ठ साधन

एक आहे साधनांच्याद्वारे सेवा करणे, ज्यात अनेक विघ्न आहेत व दुसरी आहे पवित्रतेच्या साधनेद्वारा सेवा, जी अनेकांना निर्विघ्न बनविते. पवित्रता हाच ईश्वरी सेवेचा आधार आहे. जर पवित्रतेची कमतरता असेल तर धन, तन, समय यांच्याद्वारे केलेली सेवा निष्फल ठरते. याउलट पवित्रतेच्या श्रेष्ठ आकर्षणाद्वारे सहजपणे अनेक आत्मे परमात्मा पित्याकडे आकर्षित होतात.

पवित्रतेची किरणे चोहीकडे पसरवून आपण विश्वातील दूषित वायुमंडळ स्वच्छ करू शकतो. पवित्रतेच्या शक्तीने आपण अनेक आत्म्यांचे आवाहन करु शकतो. पवित्रतेद्वारे आपण कमजोर आत्म्यांना बळ प्रदान करु शकतो. पवित्रतेच्या शुद्ध वायब्रेशनद्वारे आपण संघटन शक्तिशाली व निर्भय बनवू शकतो. अर्थात् आपल्यात जितकी पवित्रता असेल तितकी सेवा स्वतःच होते.

पवित्रता-आत्म्याचा सर्वश्रेष्ठ शृंगार

पवित्रतेहून अधिक मनुष्याची दुसरी कोणतीही सुंदरता नाही. या शृंगारापुढे सांसारिक शृंगार हे बनावटी (नकली) व फिके वाटतात. पवित्रता संपन्न आत्म्याचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावशाली अनुभवाला येते. त्यामुळे पवित्र आत्म्याला कुठल्याही बाह्य शृंगाराची आवश्यकताच नसते. अशा आत्म्यांच्या साध्या रहाणीमुळे पवित्रतेचा शृंगार अधिकच शोभून दिसतो.

जसा सूर्य आपल्या किरणांनी साऱ्या विश्वाला प्रकाशित करतो. तसाच पवित्र आत्मा देखील आपल्या पवित्रतेच्या किरणांनी विश्वातील अपवित्रतेचा अंधकार दूर करण्यासाठी समर्थ आहे. पवित्रता ही जणू साऱ्या विश्वावर छत्रछाया आहे. पवित्रतेद्वारेच अनेक आत्म्यांचे रक्षण होते. आपल्या पवित्रतेनेच सृष्टीला बळ प्राप्त होते. जर या संसारात पवित्रता नसेल तर पापाच्या भाराने ही पृथ्वी डोलायला लागेल. पवित्रतेच्या बळानेच मानव देवता बनतो व या भारतात पुन्हा स्वर्गाची स्थापना होते. म्हणूनच आजही भारतमाता आपल्याला आवाज देत आहे –

पवित्र बन, पवित्र बन, माँ भारती पुकारती।
पवित्रता के बल से यह देश बना महान था।
पवित्रता के बल से ही, तू देवता महान था।
भक्त मंदिरो में अब उतारे जिनकी आरती।
पवित्र बन, पवित्र बन ....

पवित्रतेची परिभाषा

पवित्रता ब्राह्मण जीवनाचा आधार आहे तसेच संपूर्ण पवित्रता हे ब्राह्मण जीवनाचे श्रेष्ठ लक्ष्य आहे. शिवबाबांनी समजावून सांगितले आहे, ''पवित्रता केवळ ब्रह्मचर्य (अर्थात् काम विकारात न जाणे) नव्हे तर पाच विकार, आळस, निष्काळजीपणा, बहाणेबाजी यापासून मुक्त, देहभानापासून अलिप्त, संपूर्ण आत्मिक स्थिती अर्थात कर्मातीत स्थिती. पवित्रता अर्थात ब्रह्माचारी (अर्थात् ब्रह्मा बापसमान जीवन), देहाभिमान व देहभान यापासून अलिप्त.'' अशा प्रकारची पवित्र स्थिती बनविण्यासाठी देहभानापासून अलिप्त होण्याची 'ड्रील' (योगाभ्यास) करणे अति आवश्यक आहे. पवित्रतेची मुख्य निशाणी आहे – सदा सुख, शांतीची अनुभूती. याउलट जर आत्म्याला अंशमात्र दुःखाची जाणीव होत असेल, राग-द्वेष, भय-चिंता, ईर्ष्या-आवेश यांचा अंश असेल तर पवित्रतेची कमतरता आहे, असे समजावे. अशा प्रकारचे सूक्ष्म मूल्यमापन करत राहिल्यानेच आपण ब्राह्मण जीवनात संपूर्ण पवित्रतेचे लक्ष्य प्राप्त करू शकू. **या अनुषंगाने शिवबाबांची पुढील महावाक्ये लक्षात ठेवा – ''पवित्रता आत्माकी सुख-शांति का मुख्य आधार है। पवित्र आत्मा को कब दुःख-अशांति हो नही सकती। मुख्य बात है पवित्रता की। जब आत्मा संपूर्ण पवित्र बन जायेगी तो यह पतित शरीर नही रहेगा। फिर जाकर पावन शरीर लेंगे।''**

(भावानुवाद : एक ब्रह्माकुमार)

***

'जेथे जातो तेथे...तू माझा सांगाती'

ब्र.कु. ज्ञानेश्वर, पुणे

महान लोकांची चरित्रे वाचताना एक गोष्ट सातत्याने जाणवते, लक्षात राहते ती म्हणजे एकान्त-एकाग्रता-मितभाषीपणा यांचा त्रिवेणी संगम. प्रसिद्ध वैज्ञानिक होमी जहांगीर भाभा हे अणूचे संशोधन करत असताना त्यांच्या संशोधनासाठी खास एकांताची सोय केली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांना एकांतात 'कमला' सारखे महाकाव्य सुचले तर लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्या'चा जन्मही एकांतातच झाला. गप्पा-टप्पा, विनोद, चर्चा हे सामाजिक जीवनात ओघानेच येते हे जरी खरे असले तरी आपण कितीतरी वेळा जरूरीपेक्षा जास्त बोलून आपला बहुमूल्य वेळ आणि कार्यशक्ती दोन्ही खर्च करत असतो.

आपण स्वतःच्या उन्नतीसाठी थोडा तरी वेळ द्यायला नको कां?

अणू-परमाणू दिसत नाही म्हणून काय झाले? विज्ञानाने त्याचे अस्तित्व तर सिद्ध केलेच आहे. तसेच अध्यात्म आहे. आत्म्याबद्दलचे ज्ञान हे आपल्या ज्ञानाच्या कक्षेपलीकडे अखंड, अमूर्त, असंख्यात आहे.

एकांत म्हणजे काय? तर एकाच्या अंतापर्यंत जाऊन पोहोचणे होय. परमेश्वराबद्दल अथवा परमात्मशक्तीबद्दल बोलताना नेहमीच आपला हात आकाशाच्या दिशेने जातो कारण तो सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ, सर्वमान्य आहे. त्या एकाला जाणणे, त्या अरुपाचे खरे स्वरूप ओळखून त्याच्याशी सर्व संबंध जोडणे-हे संतश्रेष्ठांना सहज जमले. म्हणून तर त्यांना संसारातील चिंता, विवंचनांचे ओझे कधीच वाटले नाही. त्यांनी तो भार परमेश्वरावर टाकला अन् ते निश्चिंत झाले.

सर्वशक्तिवान परमात्म्याला जेव्हा आपण ओळखतो तेव्हा त्याच्याशी संबंध जोडणे काहीच अवघड वाटत नाही. म्हणून तर संत तुकाराम सगळी नाती त्याच्याशी जोडून म्हणतात, ''तूच माझी माता, तूच माझा पिता, तूच बंधू, सखा... चुलता.''

आपल्याला वाटतं की हे आपल्याला कसं जमेल? कां नाही जमणार? जर खरंच एका श्रेष्ठ संकल्पाद्वारे आपण मन-बुद्धिची तार परमात्म्याशी जोडली तर तेथे आध्यात्मिक ऊर्जा चैतन्य होतेच होते.

अन् मग मिळणारे ते सुख अवर्णनीय असते, हे का सांगायला हवे? त्यालाच अतिंद्रिय सुख म्हणतात - जे इंद्रियाच्याही पलीकडचे आहे. वर्णनातीत आहे.

परमात्मा जर आपला माता-पिता, बंधू, सखा आहे तर त्याच्याशी संवाद न साधणे म्हणजे समोर असलेले पंचपक्वानाचे ताट नुसते बघत बसणे, नाही का? नुसते बघत बसून पोट तर भरणार नाही ना.

प्रपंच व परमार्थ यांचा फार सुंदर मेळ अनेक संतांनी घालायला सांगितला. पण आपले काय होते? ग्रंथ वाचून त्याने पान मिटले की बुद्धीची कवाडेही बंद होतात. आणि मग पुराणातल्या गोष्टी पुराणातच राहतात. परमात्मा आपल्याशी सर्व संबंध जोडायला आसुसलेला आहे, कमतरता आहे आपल्याकडून...

दृढ विश्वास, निश्चय एकदा झाला की मग मनाच्या गाभ्यातून आपोआपच शब्द उमटतात...

(पान क्र.२३ वर)

मौन्य मुद्रा धरावी

ब्र. कु. लाजवंती, भांडुप

आपले विचार प्रकट करण्यासाठी आपण बोलतो. भाषा ही विचारांची देवाण-घेवाण करण्याचे माध्यम आहे. मात्र आध्यात्मात कमी बोलणे वा मौनाचे महत्त्व जास्त मानले गेले आहे. मौन म्हणजे वाणीला अंशतः किंवा पूर्णतः विराम. मनाचा आणि मौनाचा घनिष्ठ संबंध आहे. पूर्वीच्या काळी मौनधारण करून गिरि-कंदरांत साधना करणाऱ्यांना मौनी किंवा मुनी म्हणत. मौन आणि मुनी हे दोन्ही शब्द 'मन्' धातूपासून तयार झाले आहेत. मन् म्हणजे विचार करणे, चिंतन करणे.

सर्वसाधारण माणूस वाणीला लगाम वगैरे लावण्याचा फारसा गांभीर्याने विचार करतो असे नाही. पण एक वैद्यकीय सत्य आहे, जास्त बोलणाऱ्या माणसाच्या मेंदूची शक्ती अधिक खर्च होते. यामुळे शिक्षकी पेशातील व्यक्तींना फार काळजी घ्यावी लागते. ज्याला एकाग्रता साधायची आहे, त्याला मेंदूच्या शक्तीची आवश्यकता असते. जर वाणीचा वापर जास्त करण्याने मेंदू थकत असेल तर एकाग्रता साधायला कष्ट पडतात. या कारणास्तव आध्यात्मात मौनाचे किंवा कमी बोलण्याचे अधिक महत्त्व आहे. काही वैद्यकीय सर्वेक्षणांत आढळून आले आहे. जे अधिक बोलतात त्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. असो! एकूणांत काय कमी बोलणे श्रेयस्कर!

जिथे ४ शब्दांत काम होणार असेल तिथे १० शब्द खर्च न करणे म्हणजे एक प्रकारे मौनसाधनाच आहे. दैनंदिन व्यवहाराचा विचार करतां याप्रकारची साधना हा सोपा मार्ग आहे. सखोलपणे विचार केला तर ज्याचे विचार सुस्पष्ट आहेत व भाषेवर ज्याचे प्रभुत्व आहे तो ही कला चटकन साधू शकतो. कमी बोलण्यासोबत सत्य बोलणे हीदेखील एक साधना मानली जाते. मात्र 'सच तो कडवा होता है' अशी चुकीची धारणाही मनात रुजली आहे. म्हणून सत्य बोलण्यासोबत, सुखदायी बोलणे महत्त्वाचे आहे. यामुळे संस्कृतात म्हटलंय सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यम् अप्रियम्।

अधिक बोलण्याचा संबंध अहंकार व क्रोधाशी जोडला जाऊ शकतो. जेव्हा आपल्या मनांत एखाद्याविषयी राग असतो किंवा बुद्धीचा सूक्ष्म अहंकार असतो तेव्हा आपण नकळत परनिंदेच्या अधीन होतो. जसं म्हणतात, योगिजन मोठी बंधने समाप्त करतात; पण या सूक्ष्म सुवर्णसाखळ्यांत अडकू शकतात. या सगळ्या ऊहापोहाचा गंभीरपणे विचार केल्यास लक्षांत येते, वाणीला लगाम घालणे वा जिंकणे किती महत्त्वपूर्ण आहे. संतांनी या कारणास्तव लिहिले असावे.

बोली बोल अमोल है, बोल सके तो बोल।
पहले भीतर तोलके, फिर बाहर को खोल।।

***

(पान क्र.२२ वरून)

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती, चालविसी हाती धरोनिया।''

याचा अनुभव मात्र ज्याचा त्याने आपापला घ्यायचा आहे. कारण साखर किती छान आहे, गोड आहे! हे वर्णन ऐकण्यापेक्षा साखरेचा दाणा तोंडात टाकून त्याची गोडी अनुभवणे जास्त चांगले नाही कां?

***

(सेवावृत्त)

हृदयरोगापासून बचाव करण्यासाठी जीवनशैलीतील बदल आवश्यक

डॉ. दिलीप नलगे, पनवेल

विश्व हृदय दिवसाचं औचित्य साधून प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मेडिकल विंगतर्फे, २९ सप्टेंबरला यू-टयूबवर एका ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.सतीश गुप्ता, डॉ.दिलीप नलगे, डॉ. मोहित गुप्ता, डॉ.सूर्यवंशी यांसारखे तज्ज्ञ या वेबिनारमध्ये सहभागी झाले होते.

ग्लोबल हॉस्पिटल अँड ट्रौमा सेंटर, माउंट आबूचे डायरेक्टर बी. के. डॉ. सतीश गुप्ताजींनी 'सच्ची दिल की निशानी - साफ दिल, स्वच्छ और खुशहाल दिल' या विषयावर उपयुक्त मार्गदर्शन केलं. हृदयरोगापासून बचाव करायचा असेल तर आपल्या जीवनशैलीत योग्य ते बदल करायला हवे. तणाव, चिंता, उदासीनता तसंच क्रोध करणे ही हृदयरोगाची प्रमुख कारणं आहेत. या रोगाचा आणि आपल्या मनाचा थेट संबंध आहे. संपूर्ण जगात सर्वाधिक म्हणजे ३० % रुग्ण हे एकटया हृदयरोगामुळे दगावतात. हा एक मनोकायिक रोग (सायकोसोमेटिक डिसीज) आहे. एक शायर म्हणतो 'अगर दिल खोल दिया होता यारोंसे, तो न खोलना पडता औजारोंसे' आयुष्यातला प्रत्येक दिवस सारखा नसतो. आज आनंद तर उद्या एखादी चिंता वाढवणारी परिस्थितीही येते. अशावेळी आपल्या कुटुंबियांशी, मुलांशी, मित्रपरिवाराशी मनमोकळा संवाद साधायला शिका. घाई गडबडीत काम करण्याची सवय असलेल्या लोकांना हृदयरोगाचा धोका अधिक संभवतो. सचोटीने वागलं तर आपलं हृदयही निरोगी व आनंदी राहतं. रोजच्या दिनक्रमात राजयोग मेडिटेशनचा अंतर्भाव केल्याने मन शांत, तणावरहित होतं. याच्या अभ्यासाने हृदयाच्या बंद नलिकाही उघडतात असा अनुभव आहे.

डॉ. मोहित दयाल गुप्तांनी या ऑनलाइन वेबिनारमध्ये बोलताना 'चौरस आहार, व्यायाम आणि ध्यानसाधना' या निरामय आयुष्याच्या त्रिसूत्रीकडे उपस्थितांचं लक्ष वेधलं. दिवसरात्र काम करताना आजचा माणूस खूप पैसा, प्रसिद्धी कमावतो, साधनं एकवटतो पण या धावपळीत तो खरं सुख, समाधान हरवून बसलाय. आचार, विचार आणि व्यवहारातील शुद्धता कमी झाल्याने हृदयरोगारखे आजार बळावतात. मेडिटेशन केल्याने आपलं मन शांत होतं आणि विचार सकारात्मक होतात. अनेक वर्षांपासून स्वत: राजयोग मेडिटेशनचा सखोल अभ्यास करणारे डॉ. मोहित गुप्ता हे नवी दिल्लीच्या जी.बी. पंत हॉस्पिटल येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

नेहमी हसतमुख राहून इतरांनाही खुश करण्याची कला अवगत असणारे मुंबईतील प्रोफेसर बी.के. डॉ. दिलीप नलगेही या वेबिनारमध्ये उपस्थित होते. दिवसेंदिवस वाढत जाणारी हृदयरोगींची संख्या पाहता, या गोष्टीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. वर्षाचे तीनशे पासष्ठ दिवस, चोवीस तास न थांबता, न थकता आपलं हृदय काम करतं. पायाच्या नखापासून डोक्यावरील केसांपर्यंत शुध्द रक्ताचा पुरवठा करण्यासाठी त्याची अविरत धडधड सुरू असते. इतक्या निष्ठावान सोबत्याची आपण काळजी घ्यायला नको का? पौष्टिक खुराक खाण्याइतकचं नेहमी आनंदी राहणंही गरजेचं आहे. त्यासाठी हवं स्वच्छ, निर्मळ मन. सत्य, अहिंसेच्या मार्गावर चालत राहिलो तर मनांत सकारात्मक

विचारांची निर्मिती होते. म्हणूनच कोणाचेही अवगुण, ग्लानी करणाऱ्या गोष्टी मनांत साठवू नका. सगळ्यांविषयी शुभभावना ठेवा.

निरोगी हृदयाची गुरुकिल्ली सांगताना रायपुरच्या एस.एम.सी हॉस्पिटलच्या डॉ. सतीश सूर्यवंशी यांनी मन-वाणी-कर्मांच्या सत्यतेवर भाष्य केलं. खोटं बोलून कामं होत असली तरी त्याने शरीरात नकारात्मक हार्मोन्स वाढतात. तणाव वाढून क्रोध प्रमाणाबाहेर गेला तर हृदयरोगाचा धोका आपसूक वाढतो. आजकाल जंक फूड खाण्याकडे कल वाढलाय. प्रमाणाबाहेर वाढलेलं वजनही धोक्याची घंटा वाजवत असतं. हे टाळायचं असेल तर दिवसाची सुरूवात वर्तमानपत्र किंवा टीव्हीवरच्या बातम्यांनी न करता सुविचारांनी व्हायला हवी. व्यायाम तसंच राजयोग मेडिटेशनचा अभ्यास करण्यासाठी पहाटेची शांत, सुंदर वेळ सर्वोत्तम. तेव्हा भरून घेतलेली शुध्द हवा शरीराला आणि सकारात्मक विचार आपल्या मनाला दिवसभर उर्जा देतात. त्याचप्रमाणे आहारात अधिकाधिक फळं आणि सॅलेड्सचा अंतर्भाव करावा. तेल-तुपाचं प्रमाण कमी असावं.

शांती सरोवर रायपुरच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी कमला दीदी या वेबिनारला उपस्थित होत्या. सध्या कोरोना विषाणूच्या प्रकोपामुळे वाढती बेरोजगारी, भय, तणाव, दुर्बळ मानसिकता इ. समस्या निर्माण झाल्या आहेत. या सगळ्याला समर्थपणे सामोरं जायचं असेल तर आत्मविश्वास वाढवायला हवा. राजयोगाच्या निरंतर अभ्यासाने मन शक्तिशाली बनतं. शिव परमात्म्याशी बुद्धियोग जोडून मनाला सशक्त करण्यासाठी राजयोगाची विधी शिकून घ्यायला हवी. कमला दीदींनी आपल्या योगयुक्त, मधुर वाणीने सर्वांना आपलंस करताना, २१ जन्मांसाठी संपूर्ण सुख-शांतीचा ईश्वरी जन्मसिध्द अधिकार प्राप्त करून घेण्याची प्रेरणा दिली.

इंदूर झोनच्या मुख्य क्षेत्रीय समन्वयक ब्रह्माकुमारी हेमलता दीदींनीही उपस्थितांना मार्गदर्शन केलं. मनातील विचारांचा थेट प्रभाव आपल्या शरीरावर होतो. नव्वद टक्के आजारांचं मूळ हे मनोविकारांत दडलेलं असतं असं आढळून आलं आहे. मनांत पवित्रता आणि शुद्धता असेल तर सर्वांविषयी शुभभावना निर्माण होते. हेच खरं निर्मळ हृदय. ज्यायोगे मनांतल्या सगळ्या शुभ इच्छा पूर्ण होतात. विश्व हृदय दिवसानिमित्त सगळ्यांना सुंदर, सुदृढ हृदयासाठी शुभेच्छा. विश्वातील सर्वांचं भलं होवो. सगळे सुखी राहोत. ओम शांती.

***

(पान क्र.१५ वरून)

दसऱ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा आपणही मनातील खऱ्या रामाला, श्रेष्ठ शुभ वृत्तीला ओळखूया, त्याची वृद्धी करूया.

आत्मारूपी सीता पंचवाटीकेत बंदिस्त आहे, अर्थात पंचकर्मेंद्रिय व पंचज्ञानेंद्रियांच्या अधीन आहे, तिला परमात्म्याच्या स्मृतीची खुणेची अंगठी दाखवून शोकवाटिकेतून अशोकवाटिकेत घेऊन जाऊया. प्रभूस्मृतीने रोज आत्मारुपी सीतेला जागृत केले तरच मायामोहाच्या कांचनमृगाला ओळखण्याची कला आत्मसात करता येईल. ईश्वरी मर्यादेचे पालन करण्याची, लक्ष्मणरेषा न ओलांडण्याची सद्बुद्धी होईल व आपल्या मनोभूमीवर रामाचे अखंड राज्य राहील. जेव्हा प्रत्येक जण असे मनापासून करेल तेव्हाच प्रत्येक मनुष्यात्मा सुखी होऊन अखंड रामराज्याची संस्कृती उदयाला येईल.

***

सुविचार

जो दुसऱ्यांना ओळखतो, तो ज्ञानी, जो स्वतःला ओळखतो तो शहाणा.

सनथ ते सनथकुमार...

ब्र. कु. सनथ, ठाणे (प.)

२१ नोव्हें. १९५५ रोजी केरळ येथे एका चांगल्या परिवारात माझा जन्म झाला. माझं नाव सनथ ठेवलं गेलं. ह्या 'सनथ'चा सनथकुमार कसा झाला त्याची ही कथा आहे.

आई-वडिलांच्या चांगल्या पालन पोषणात वाढलो तरीही वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षीच मला वाईट मित्रांची संगत लागली व त्यांच्यामुळे सिगरेट, चरस गांजाची सवय लागली. त्याच सुमारास मी तबला शिकत होतो. काही कलाकारांबरोबर कार्यक्रम सुद्धा करत होतो. त्या कलाकारांमध्ये देखील काहींना सिगरेटचे व्यसन होते त्यामुळे माझे व्यसनसुद्धा वाढीस लागले. जणू काही ह्या व्यसनाच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण मिळालं. हळूहळू मी व्यसनी आहे हे समाजात पसरलं. ज्या क्षणी वडिलांना हे समजलं त्यांनी सर्वांसमोर मला श्रीमुखात भडकवली व मला तो अपमान सहन झाला नाही आणि त्या रागाच्या भरात मी घर सोडण्याचा निश्चय केला; पण आई व नातेवाईकांनी मला समजावलं व थोपवून धरलं पुढे कॉलेजचं जीवन सुरु झालं. तिथेही माझ्या खोड्या कमी झाल्या नाहीत. तुम्हाला कदाचित विश्वास बसणार नाही पण त्याकाळात कालिकत विश्व विद्यालयात ०/१०० (शंभरापैकी शून्य) गुण मिळवणारा मी एकमेव विद्यार्थी होतो. हा पराक्रम मी का केला त्याची एक कहाणी आहे. हे सर्व माझ्या मस्तीखोर स्वभावामुळे मी करत होतो. मी असा विचार केला की १००/१०० तर कठीण आहेच पण ०/१०० मिळवून दाखवले तर माझ्या नावावर कॉलेजमध्ये एक विक्रम नोंदवला जाईल व ह्या विक्रमासाठी मित्रांबरोबर मी पैज लावली. जो अर्ध्या तासाच्या आत परीक्षा हॉलमधून बाहेर येऊन समोरच्या दारुच्या दुकानात आधी पोचेल त्याला इतर मित्रांनी स्वतःच्या पैशाने दारु पाजायची. अर्ध्या तासाचं बंधन पण अशासाठी की परीक्षक अर्ध्या तासाच्या आधी हॉलमधून बाहेर जाऊ देत नसत. मी २६-२७ मिनटे झाल्यावर भुणभूण सुरु करायचो. माझा पेपर सोडवून झाला आहे मला जाऊ द्या. माझा पेपर सोडवून होत असे कारण मी प्रश्नपत्रिका बघतच नसे प्रत्येक उत्तर पत्रिकेत मी कधी चित्रपटाची कथा कधी काही विनोद, गाणी इ. लिहीत असे. ही युक्ती वापरुन मी सहाच्या सहा दिवस अर्ध्या तासाच्या आत दारुच्या दुकानात सर्वांच्या आधी पोहचलो. दारुची पैज तर जिंकलीच व ०/१०० या विक्रमसुद्धा नोंदवला.

हे सर्व अशासाठी सांगतोय की माझा जिद्दी स्वभाव होता मला जे हवं आहे त्यासाठी मी काहीही करायला मागचा - पुढचा विचार करत नसे. कॉलेजमध्ये असतानाच भारतीय नौदलाच्या प्रशिक्षणासाठी मुंबईमध्ये जाण्याचा योग आला. रोज ५ वा. प्रशिक्षण संपायचे. नंतर सुटी मिळायची ज्याला आपण लिबर्टी टाइम म्हणतो तसा वेळ घालवण्यासाठी मित्रांबरोबर मुंबईच्या गल्ली गल्लीत उडाणटप्पूगिरी करत फिरायचो व रोज रात्री २ वाजता परत येत असे. वय वर्ष २० ते ३० ही १० वर्ष ही माझी दिनचर्या होती. त्यानंतर माझं लग्न झालं. परन्तु आंतरजातीय विवाह केल्याने घरांत खूप वादंग झाला. नंतर काही महिन्यांनंतर वातावरण निवळलं. आम्हाला संतान सुख नव्हते म्हणून मी खूप दुःखी होतो. त्यासाठी अनेक नवस सायास केले. तरीही निराशा पदरी पडल्याने मनःशांतीसाठी मी साईबाबांच्या मंदिरात सेवेकरी म्हणून जात असे. एकीकडे

व्यसनं तर चालूच होती. सिगरेटचं व्यसन तर इतकं वाढलं होतं मी दिवसाला ६०-६० सिगरेटस ओढीत असे. वय वर्ष १३ ते ४८ जवळ जवळ ३५ वर्ष मी व्यसनाधीन अवस्थेत घालवली. कितीही प्रयत्न करुन व्यसनं सुटत नव्हती सिगरेट सोडण्याचा माझा निश्चय २-३ तासच टिकत असे नंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या. हे करता-करता-

एक दिवस माझ्या आयुष्यात असा आला की माझे सिगरेटचे व्यसन एका दिवसात सुटले!

किस्सा असा झाला की एकदा साईबाबांच्या मंदिरात एक साधू आला होता. सर्वजण म्हणू लागले, 'चला त्यांचा आशीर्वाद घेऊ.' मी त्या साधूजवळ गेलो त्याने माझ्याकडे बघितलं व म्हणाला, ''बेटा आज तुझ्याकडे एक गोष्ट मागतोय. तुझी सर्वात आवडती गोष्ट इथे माझ्याजवळ सोडून जा.'' मी विचार करू लागलो अशी कुठली गोष्ट आहे जी मला अत्यंत प्रिय आहे. मग डोक्यात एकदम टयूब पेटली की ह्या साधूच्या निमित्ताने साईबाबाच माझं सिगरेटचं व्यसन सोडायला तर सांगत नाही नां?

मी मनांत असा विचार केला की इतके वर्ष अनेक प्रयत्न करुनही मी सिगरेट सोडू शकलो नाही आज तुम्हीच आपल्या शक्तीने मला ह्यातून मुक्त करा! व मनोमन माझी अत्यंत प्रिय गोष्ट सिगरेट मी त्या साधूसमोर अर्पित करुन टाकली. मंदिरात गेलो पूजा-आरती सर्व झाल्यावर भोजन झाले त्यानंतर मला एकदम आठवण झाली अरे हे काय दोन तीन तास उलटले होते तरीही मी सिगरेटच ओढली नव्हती.

वास्तविक माझ्या खिशात सिगरेटस व लायटर दोन्ही होतं व माझा भाऊ माझ्यासमोर सिगरेट ओढत होता आणि तरीही मला सिगरेट ओढण्याची इच्छा नव्हती.

आजपर्यंत असे कधीच झालं नव्हतं. मी विचार केला २-३ तास झाले अजून थोडं थांबून बघू काय होतं ते ! संध्याकाळ झाली. रात्रीचं जेवण झालं तरीही मला सिगरेटची तलफ येत नव्हती. मला वाटू लागलं साईबाबाच हे करवित असावेत. १ दिवस गेला, दोन दिवस झाले मला सिगरेटची आठवणसुद्धा झाली नाही. मी जो त्यातून मुक्त झालो तो कायमचाच! माझ्याकडच्या सिगरेटस् मी भावाजवळ दिल्या व त्या दिवसापासून माझ्यात हे कायमचं परिवर्तन झालं.

सिगरेट सुटण्यासाठी जशी ही घटना कारणीभूत ठरली तसं दारू व मांसाहारापासून मला शिवबाबांनी कसं परावृत्त केलं त्याचीसुद्धा मजेशीर कहाणी आहे.

मला माझ्या वयाच्या ५५ व्या वर्षीच रिटायर होण्याचा विचार मनांत घोळू लागला. मी त्यासाठी काहीतरी निमित्तच शोधू लागलो. त्या सुमारास काही मित्रांनी एका रिसॉर्टमध्ये फेअरवेल पार्टी आयोजित केली होती. तिथे पोहण्याच्या तलावात उतरताना माझा पाय घसरुन मी पडलो व माझ्या माकडहाडाला आघात झाला. काही दिवस अंथरुणावर खिळून राहिलो. तेव्हा मनांत विचार आला हेच कारण देऊन आपण रिटायर व्हावं व मी V.R.S. स्वेच्छा निवृत्ती घेतली व त्यानंतर बरोबर १० दिवसातच या ज्ञानमार्गात आलो. मला आठवतंय शनिवार होता. मी माझ्या पुतणीबरोबर R.T.O. ऑफिसमध्ये गेलो होतो. तेव्हा तिथे पांढऱ्या शुभ्र वस्त्रांतली एक व्यक्ती माझ्याकडे टक लावून बघतेय असं मला जाणवलं (त्यावेळेस अशा बघण्याला आत्मिक दृष्टीने बघणे म्हणतात हे माहीत नव्हतं). ती व्यक्ती माझ्याकडे आली व म्हणाली, ''तुम्ही प्रजापिता ब्रह्माकुमारी ई.वि.वि. या संस्थेचं नाव ऐकलंय का ? त्या विषयीची माहिती जाणून घेण्यास उत्सुक आहात का ? मी म्हटलं, ''हो माझी पत्नी शिवानी दीदीचे टॉक शो बघते; पण मी मात्र ते बघत नाही. लगेच T.V. चॅनल बदलतो. तिने त्यावर मला संस्थेची मासिकं दाखवून त्याच्या वर्गणीबद्दल सांगितलं. मी लगेच होकार देऊन पैसे भरले व माझा पोस्टल पत्ता दिला. मी वसंत विहार विभागात राहतो हे बघून त्या बहिणीने मला सांगितलं, ''उद्या तुमच्या घराजवळच आमच्या संस्थेत डॉ. रतन राठोड नावाचे हृदयरोगतज्ज्ञ येणार आहेत. त्यांचा सेमिनार ऐकायला

तुम्हाला जमेल का ?'' मी विचार केला नाहीतरी उदया रविवार आहे, जाऊन बघायला काय हरकत आहे? आपल्या हृदयात काय घडतयं ते समजून तर घेऊ.

दुसऱ्या दिवशी सेमिनार ऐकून तर मी जाम खुश झालो. असा सेमिनार तर मी आजपर्यंत ऐकला नव्हता. सेमिनारमधे ते हार्ट ब्लॉकेजेस राजयोगामुळे कसे कमी होतात ते पुराव्यासहीत दाखवत होते. मी विचार करू लागलो, ईश्वराच्या आठवणीत राहिल्याने शरीरात व मनांत किती फरक पडू शकतो. मी तर ह्याच गोष्टीच्या शोधात होतो.

ह्याच विचारात घरी आलो व सर्व मित्रांना फोन करुन सांगितलं आजची दारुची पार्टी कॅन्सल ! सर्व मित्रांना राग आला. असं अचानक रद्द का केलंस? असं तू करू शकत नाहीस. आम्हीसुद्धा आमचे कार्यक्रम त्याप्रमाणे ठरविले होते इ. खूप बोलल्यावर मी त्यांना शांत करण्यासाठी सांगितलं की काही अपरिहार्य कारणामुळे आपण करू शकणार नाही. असं म्हणून त्यांना गप्प केलं आणि इकडे मी दारूच्या बाटल्या, नॉनव्हेज, कांदा लसूण इ. सर्व गोष्टी पॅक करुन भावाजवळ दिल्या व मी त्यातून मुक्त झालो. तो दिवस व ती तारीख अजूनही माझ्या डोळ्यासमोर आहे २०/११/२०११. दुसऱ्या दिवशी सोमवार होता व तारीख होती २१/११/२०११. त्यादिवशी माझा ईश्वरी ज्ञानाचा साप्ताहिक कोर्स सुरु झाला व योगायोग बघा माझा जन्म झाला ती तारीख देखील २१ नोव्हेंबरच ! या दिवशी सनथकुमार म्हणजे ब्रह्माकुमार झालो. कारण भक्तिमार्गात सनथ म्हणजे ब्रह्मा !

ह्या अलौकिक जन्माकरिता व जीवनाकरिता मी बापदादांचा ऋणी आहे. बाबा हातात हात घालून माझ्याबरोबर असतात असा रोज मला अनुभव होतो. काहीही प्राप्ती झाली नाही असा एकही दिवस जात नाही. रोजच्या अनुभूतीकरता मी कितीही धन्यवाद दिले तरी ते कमीच आहेत.

शेवटी वाचकांना एवढंच सांगू इच्छितो की माझे अनुभवकथन वाचल्यानंतर जर कोणी या ज्ञानमार्गावर चालण्यास प्रेरीत झालं तर मी स्वतःला भाग्यशाली समजेन. तुम्हाला व्यसनं असोत वा नसोत प्रत्येकाने हा मार्ग स्वीकारला पाहिजे असं वाटतं. कारण मनुष्यापासून देवता बनविणारा परमेश्वर स्वतः येऊन हे ज्ञान देत आहे व तरी देखील आपण त्याच्याकडे पाठ फिरवली तर त्याला दुर्भाग्यच म्हणावं लागेल !

***

(पान क्र.१६ वरून)

वही प्रारंभ करूया आणि दिवाळीच्या गोड फराळाबरोबर संपूर्ण जीवनात एकमेकांविषयी आदर, प्रेम, मदतीचा हात अशी मधुरतेची गोडी असलेली मिठाई वाटूया. तर पाच दिवस काय; पण संपूर्ण जीवनच उत्साह संपन्न दीपावली बनेल.

पण यासाठी पाहिजे ते आत्मिक बळ, योग्य मार्गदर्शन. त्यासाठी गीतेच्या वचनानुसार यदा-यदाही धर्मस्य... स्वतः परमपिता परमात्मा महाज्योती या सृष्टीवर अवतरित होऊन आपणा सर्वांना सहज आत्मज्ञान आणि सहज राजयोगाची विधी शिकवत आहे.

***

(पान क्र.१७ वरून)

म्हणून तर तुम्ही ह्या वरदान भूमीत येऊन पोहोचला आहात. तुमच्यातील प्रत्येकात काही विशेष गुण आहेत ते कोणते आहेत ते प्रथम जाणून घ्या. त्याचा ईश्वरी सेवेत वापर करत रहा म्हणजे ह्या गुणांची, वैशिष्ट्यांची, वृद्धीच होत राहील. कधीही अहंकारी बनू नका. अशा गुणांच्या सतत वापरण्याने ते वाढतीलच; पण बाकीचे जे अवगुण/दोष आहेत तेसुद्धा हळूहळू नष्ट होत जातील. म्हणून बाबा सतत सांगत आहेत की 'मी परमात्म्याचा पुत्र' ह्या शुद्ध भावनेत सतत रहा, ब्राह्मण जीवनाच्या ज्या मर्यादा आहेत त्याचे पालन करत रहा, सध्याच्या काळाचे भान ठेवा, सततच्या ह्या अभ्यासाने 'अंत मति सो गति' चांगली होईलच.

भावानुवाद : ब्र. कु. विनय, ठाणे (प.)

***

नागपूर (वसंत नगर)– विश्व शांति सरोवरच्या वर्धापन दिनानिमित्त दीप प्रज्वलन करताना ब्र. कु. रजनी दीदी, भ्रा. सुशील अग्रवाल, ब्र. कु. प्रेम प्रकाश, ब्र. कु. दमयंती, ब्र. कु. मनीषा व अन्य मान्यवर

अहमदनगर – डॉ. ब्र. कु. दीपक हरके यांस इंडिअन प्राईड २०२० ॲवॉर्डने सम्मानित करताना फिल्म अभिनेता विवेक ओबेरॉय व सोबत ब्र. कु. ज्योती, ब्र. कु. सुनिता

लातूर :– ब्र.कु. नंदादीदींचा 'नवदुर्गा' पुरस्कार देऊन सन्मान करताना महिला मोर्चा अध्यक्षा सौ. मीना भोसले, नगरसेविका सौ. शोभा पाटील, जैन संघटनाच्या अध्यक्षा सौ. कोंदेकर

Registration No. : MAHMAR/2007/21914

भावपूर्ण श्रद्धांजली

मुलुंड सबझोन अंतर्गत ठाणे (पश्चिम) सेवाकेंद्राच्या पूर्वज रत्नांपैकी एक, ब्र. कु. मंगलामाता यांनी मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०२० रोजी ब्राह्ममुहूर्तावर ३ वाजता आपले नश्वर शरीर सोडून बापदादांच्या कुशीत विसावल्या. ब्र. कु. मंगलामाता, या अमृतकुंभचे माजी संपादक ब्र. कु. दिनकरभाई चिटणीस यांच्या सुविद्य पत्नी होत्या. त्यांचे वय ८५ वर्षांचे होते.

वर्ष १९७६ पासून ब्र. कु. दिनकरभाई आणि मंगलामाता दोघांनी ईश्वरी ज्ञानमार्ग अनुसरला. २८ जुलै २००३ मध्ये दिनकरभाईंनी आपले नश्वर शरीर सोडले. तोपर्यंत मंगलामातांनी त्यांना अमृतकुंभच्या कार्यात संपूर्ण साह्य केले.

मंगलामातांना ईश्वरी ज्ञानदानाची विशेष आवड होती. घरी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्या परमात्मा शिवाचा सत्य परिचय आवर्जून देत. जे ज्ञान आपल्याला मिळाले आहे ते सर्वांना मिळावे आणि सर्वांचे जीवन सुखी व्हावे असे त्यांना वाटे. शिवबाबांकडून त्यांना जणू सेवेचे वरदानच मिळाले होते. अनेकांना ईश्वरी ज्ञानदान (साप्ताहिक पाठ्यक्रम) करून त्यांना शिवबाबांचे (पक्के बच्चे) अर्थात् निश्चयी मुले बनविले. कुटुंब-परिवारातील सर्वांना ज्ञान देऊन त्यांनी या ईश्वरी कार्याच्या, ब्रह्माकुमारी संस्थेच्या संपर्कात आणले.

१९९५ साली पुण्याला स्थलांतर केल्यावरही त्यांनी आपल्या घरी क्लास सुरू केला आणि तिथेही अनेकानेक आत्म्यांना ईश्वरी संदेश दिला.

अतिशय शांतचित्त, मनमिळाऊ, संपूर्ण निश्चयबुद्धी अशा मंगलामातांची लौकिक मुलगी ब्र. कु. मीनाक्षीबेन गेल्या २८ वर्षांपासून समर्पित जीवन व्यतीत करत आहेत. ब्र. कु. मीनाक्षीबेन, मुलुंड सबझोन अंतर्गत ठाणे (पूर्व) सेवाकेंद्राच्या संचालिका आहेत.

मंगलामातांच्या जीवनात ज्ञान आणि योगाचे संपूर्ण संतुलन पहायला मिळाले. साकार आणि अव्यक्त मुरलीचे स्पष्टीकरणही त्या चांगल्या प्रकारे करीत असत. शिवबाबांच्या कार्यात त्या तन-मन-धनाने सहयोगी होत्या. बापदादांच्या अशा स्नेही, तसेच ईश्वरी यज्ञस्नेही, दादी-दीदी, सर्व टीचर बहिणी आणि अलौकिक ब्राह्मण परिवाराच्या स्नेही मंगलामातांना मुलुंड सबझोनच्या संपूर्ण परिवारातर्फे श्रद्धासुमनांजली अर्पण करीत आहोत.

ब्र. कु. गोदावरी दीदी
संचालिका मुलुंड सबझोन, प्रकाशिका, अमृतकुंभ